
# हाकारा


वर्ष सहावे
अंक तिसरा
जुलै-सप्टेंबर १९८५





## आदिवासी स्त्रियांच्या समस्या व संघर्ष
## विकासातील स्त्रियांची भूमिका
## मला उध्वस्थ व्हायचंय !
## मानुषी





# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मार्गदर्शक : प्रा. गं. बा. सरदार

## ❀ कार्यकारी मंडळ ❀

| | |
|---|---|
| अध्यक्ष : | जनार्दन वळवी |
| उपाध्यक्ष : | शरद कुलकर्णी |
| चिटणीस : | रा. के. मुटाटकर |
| सहचिटणीस : | लक्ष्मण कुलकर्णी |
| खजिनदार : | बाबुल पठाण |
| सभासद : | विजय भानू |
| | गोविंद गारे |
| | सुधीर जोग |
| | छायाताई सुरतवंती |
| | सुरेखा दळवी |
| | एकनाथ बावनकर |


## यांच्या सहकार्याबद्दल परिषद आभारी आहे !

- महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ.
- शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार.
- भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र.
- आदिवासी कल्याण संचालनालय, महाराष्ट्र शासन.
- वनविकास महामंडळ, महाराष्ट्र.
- कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.

वर्ष सहावे / अंक तिसरा
जुलै–सप्टेंबर १९८५

**संपादक मंडळ :**
जगदीश गोडबोले
शरद कुलकर्णी
राजाभाऊ राजगडकर

**संपादक :**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक :**
सुषमा सोनक

**संपादन साहाय्य :**
रमाकांत पाटील

**मुखपृष्ठ :**
मिलन खानोलकर

**निर्मिती/व्यवस्थापन :**
विजय लेले
परफेक्ट कम्युनिकेशन सर्व्हिसेस,
१ मानसी, पत्रकारनगर, पुणे १६.
फोन : ५०६७२

---

परिषद/हाकारा संयुक्त
वार्षिक वर्गणी : २० रुपये
एका अंकाची किंमत : ५ रुपये

पत्रव्यवहाराचा पत्ता :
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४/३ आनंद पार्क, औंध,
पुणे ४११ ००७.

**प्रकाशक :**
प्रा. रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
पुणे यांनी महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषदेसाठी सहकार मुद्रणालय,
५४० गणेश पेठ, पुणे २ येथे छापून
प्रसिद्ध केले.

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता।

# हाकारा

## (महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक)

## * अनुक्रमणिका *

### आदिवासी महिला विशेषांक


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय : आदिवासी स्त्रियांचे प्रश्न | २ |
| २) | आदिवासी स्त्रियांच्या समस्या व संघर्ष – मीरा सावरा | ४ |
| ३) | विश्वास बसेल तुमचा यांवर ? – कुसुम नारगोलकर | ८ |
| ४) | महिला कार्यकर्त्यांचे चर्चासत्र | ११ |
| ५) | महिला कार्यकर्त्यांचे चर्चासत्र–सहभाग | २१ |
| ६) | मी, कुसुम सोनावणे – शब्दांकन रमाकांत पाटील | २२ |
| ७) | जागतिक महिला परिषद : नैरोबी | २५ |
| ८) | स्त्रियांना भेडसावणारा रक्तक्षय | २६ |
| ९) | विकासातील स्त्रियांची भूमिका | २७ |
| १०) | पुस्तक परीक्षण–मला उध्वस्त व्हायचंय – विनिता सामंत | २९ |
| ११) | संस्था परिचय–मानुषी | ३२ |
| १२) | आदिवासी जमीन हस्तांतर परिषद–वृत्तांत | ३४ |
| १३) | वेठबिगार मुक्त झाले-पण पुढे ? – विजय साठे | ३७ |
| १४) | संवाद | ४० |

स्त्री संपादकीय

# आदिवासी स्त्रियांचे प्रश्न

जुलै–सप्टेंबर १९८४ चा हाकारा आदिवासी संस्कृती स्त्रियांना कोणते सामाजिक स्थान देते आणि आदिवासी समाजातल्या स्त्री स्वातंत्र्यसूचक परंपरा कोणत्या याचा परामर्श घेणारा होता. बरोबर एका वर्षाने हाकारा या अंकात पुन्हा स्त्रियांचे प्रश्न उकलत आहे. पारंपारिक हिंदू स्त्रीची प्रतिमा नेहमी 'भारतीय स्त्री प्रतिमा' म्हणून मांडली जाते व त्यातून आदिवासी स्त्रीची वैशिष्टचे व प्रश्न दोन्ही सहजगत्या वगळल्या जातात. आदिवासी स्त्रीची बरीचशी स्वतंत्र, बरीचशी स्वैर अशी जी प्रतिमा मांडली जाते, ती वास्तवाला कितपत धरून आहे याबाबत साधकबाधक चर्चा काहीच होत नाही. आदिवासी समाजात स्त्रीचा डाकन, भूताळी ठरवून, मारून टाकण्याइतपत मजल जाते. नुकतेच रायगड जिल्ह्यात असे एक प्रकरण घडले. स्त्रियांवर घोर अन्याय करणाऱ्या अशा अंधश्रद्धा अजून या समाजात जशा तग धरून आहेत तसेच अगदी पुरोगामी स्त्रियांच्या चळवळीला ओज देऊ शकेल असे कितीतरी सामर्थ्य आदिवासी स्त्रियांच्या जीवनात आहे. मातृहक्क, घोटूल, जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य, स्त्रीच्या श्रमाची प्रतिष्ठा, निर्भयता, वेश्यावृत्तीचा अभाव, अनेक जीवनावश्यक अशी मूल्ये आदिवासी समाजात सापडतात. वर्ग, वर्ण सामाजिक परंपरा व आपली ऐतिहासिकता यामुळे भारतीय स्त्रियांची शक्ती दुभंगलेली आहे. अडाणी समजल्या जाणाऱ्या आदिवासी स्त्रीकडून पांढरपेशा मध्यमवर्गीय स्त्रीला केवढे घेण्यासारखे आहे, आणि शिक्षणापासून वंचित होऊन सावकार-जमीनदाराच्या लालसेला सहज बळी पडणाऱ्या आदिवासी स्त्रीला तिने कितीतरी देण्यासारखे आहे. स्त्रियांच्या सर्व थरांमध्ये पूल जोडले जावे याकरिता एकमेकींच्या जीवनानुभवाची ओळख होणे जरुरीचे आहे ह्या दृष्टिकोनातून हाकारा आदिवासी स्त्रीविषयक प्रश्न मांडत आलेला आहे.

या अंकाचे स्वरूप मागील अंकापेक्षा वेगळे आहे. मीरा सावरा यांच्या अनुवादित लेखात आदिवासी स्त्रीच्या प्रतिमेचा व परंपरांचा, तिच्या सामाजिक स्थानाचा उपरोनिर्दिष्ट जो आलेख मांडला जातो त्याचे विश्लेषण केलेले आहे. आदिवासी स्त्रीचे स्वातंत्र्य, समानता हे जे वैशिष्टच सांगितले जाते ते वास्तवात तिच्या जीवनात कुठे कुठे सापडते व कुठे कुठे हरवते याचा परामर्श या लेखात घेतला आहे. केवळ पारंपारिक हिंदू स्त्रीशी तुलना करून आदिवासी स्त्री स्वतंत्र आहे असे म्हणून भागणार नाही. अभ्यासकांनी प्रत्यक्ष जीवनाचा अभ्यास करून कुठे कुठे हे मूल्य प्रतीत होते व कुठे त्याचा अभाव आढळतो हे शोधण्यासाठी आदिवासी स्त्रीजवळच गेले पाहिजे. आज हे होताना दिसत नाही. मीरा सावरा यांनी आपल्या लेखात कष्टकरी संघटनेने आदिवासी स्त्रियांचे संघटन कसे केले व आज संघटनेची स्त्रियांची फळी केवढी मजबूत आहे हे नोंदले आहे.

दि. १२ मार्च रोजी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने महिला कार्यकर्त्यांचे चर्चासत्र घेतले. हे चर्चासत्र घेण्यामागे ही भूमिका होती की स्त्रियांच्या प्रश्नांवर केवळ लिहिणे, विश्लेषण करणे पुरेसे नाही. तर स्त्रियांच्या इतर शोषितांच्या जाणीवजागृतीसाठी प्रत्यक्ष ज्या स्त्री कार्यकर्त्या काम करतात त्यांची, प्रत्यक्ष अनुभवांची देवाणघेवाण मोलाची आहे. ती डोळे उघडून वास्तवाकडे पहायला भाग पाडते. आर्थिक, सामाजिक विषमता दूर करण्यासाठी आदिवासी, ग्रामीण दलित, शहरातील झोपडपट्टी अशा अनेक विभागात अनेक स्वयंसेवी संस्था, संघटना काम करत आहेत. या सर्व संघटनांच्या मतप्रणाली व विकासाच्या व्याख्या वेगवेगळ्या आहेत. आणि त्याबाबत कुणाचा वाद असण्याचे कारण नाही. मात्र या सर्व संघटनांची लिंगभेदावर आधारलेल्या विषमतेबाबत काय भूमिका आहे? समाजात समानतेसाठी झगडणाऱ्या या संघटनांची अंतर्गत रचना कशी आहे? समानतेचे मूल्य

त्या स्वत:मध्ये रुजवू शकल्या आहेत का? स्त्रियांना ही मूल्ये संघटनेत रुजवण्यासाठी संघटनेशी संघर्ष करावा लागला काय? त्याचे स्वरूप कोणते होते? तसेच कार्यकर्त्यांना स्त्रिया म्हणून प्रत्यक्ष समाजात कोण-कोणत्या विशेष प्रश्नांना सामोरे जावे लागले. अशा-सारखे विविध प्रश्न उभे व्हावे व व्यक्तिगत अनुभव तपासले जावेत अशी या सत्राकडून अपेक्षा होती.

या अंकात गरीब डोंगरी संघटनेच्या कुसुम सोनवणे यांचे आत्मकथन आहे. संघटनेचे काम करताना सामाजिक विषमतेचे कोणकोणते अंत:प्रवाह जाणवले व लिंगभेदावर आधारित व्यवस्थेशी एका दलित स्त्री कार्यकर्तीने कसा अथक झगडा दिला याचे शब्दांकन रमाकांत पाटील यांनी केलेले आहे. कामाची नुसती सुरवात करणे किती मुश्कील करून टाकले जाते हे यातून जाणवते.

कुसुम नारगोळकर यांच्या लेखात आदिवासी क्षेत्रातील कार्यकर्त्यांना वारंवार सामोरा येणारा एक प्रश्न म्हणजे जशी पुढारलेल्या समाजात स्त्री हुंडाबळी होते तर आदिवासी समाजात डाकन म्हणून दगडाने ठेचून मारली जाणे, तापल्या तव्यावर उभे केली जाते. याची कारणमीमांसा करताना यातून असे जाणवते की समाजावर कुठल्याही दिशेने येणाऱ्या जबरदस्त तणावा-खाली बहुधा स्त्रीचा पहिल्या प्रथम बळी जातो या प्रश्नाच्या अगदी मुळाशी हात घालायचा झाला तर कार्यकर्त्यांनी विषमता निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, शास्त्रीय दृष्टिकोनाचे शिक्षण, लैंगिक शिक्षण या सर्व लोकशिक्षणाच्या बाजू एकाच प्रश्नात समजून घेणे किती जरुरीचे आहे हे दिसून येते. कुसुम नारगोळकर यांचा लेख कार्यकर्त्यांना या दिशेनं विचार करायला उपयुक्त ठरावा.

स्त्रियांच्या विकासाकरता सरकार आता पैसा ओतते. पण स्त्रीविषयक पारंपारिक दृष्टिकोन न बदलता आखलेल्या योजना खऱ्या परिवर्तनाला कितपत चालना देऊ शकतात हा एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न संघटनांपुढे ठेवायला हवा आहे. या संदर्भात संस्था परिचय या सदरात यावेळेस मानुषी या मासिकाचा परिचय देण्यात आलेला आहे. मानुषीने दलित, आदि-वासी व पांढरपेशा स्त्रियांचा आवाज उंचावला. स्त्रियांचा एक गट हे मासिक चालवतो. ते वाचू नये



म्हणून सुशिक्षित मध्यमवर्गीय मुलींना घरातून तंबी मिळते व त्यांची लग्ने लवकर जुळवण्याचे प्रयत्न होतात. पत्नीसाठी फेमिना, इव्हज् विकलीची वर्गणी भरायला कांकू न करणारे नवरे मानुषीची वर्गणी भरायचे नाकारतात. स्त्रीला खरोखर बोलते करू पहाणारे एखादे माध्यम केवढया प्रचंड शक्तीला जागे करू शकते व ती प्रेरणा मुळातच उखडून टाकण्याचे प्रयत्न कसे होतात याचे जिवंत उदाहरण इथे आहे.

मलिका अमरशेख यांच्या वादग्रस्त पुस्तकाचे परिक्षण विनीता सामंत यांनी केलेले आहे. सोशिकपण, मध्यमवर्गीय खाजगीपणाचे मूल्य नाकारले तर अनुभवाचा केवढा दस्तऐवज हाती लागतो! आजच्या समाजात स्त्री-पुरुषात कोणते नाते शक्य आहे? केवळ शारीरिकता आणि एकमेकांची मानसिक हिंसा एवढेच खरे? हे मलिका अमरशेखचे काही अस्वस्थ प्रश्न. हाकाराला असे वाटते की आदिवासी स्त्रीचा विचार व्हायला हवा. वेगवेगळ्या गटातल्या व थरातल्या स्त्रियांचे अनुभव बोलके व्हावे, स्त्रीने आपल्या विषम परिस्थितीला मुखर व्हावे.

वेगवेगळया थरातील गटातील स्त्रियांचे प्रश्ना-प्रमाणेच आदिवासी स्त्रियांचेही प्रश्न आहेत. त्यादृष्टीने एकत्रितपणे ह्या प्रश्नाकडे पाहायला हवं. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्री कार्यकर्त्यांना-किंबहुना पुरुष कार्यकर्त्यांना तसेच समाजालाही त्या दिशेने नजर वळविण्यास हा अंक उपयुक्त ठरावा.

# आदिवासी स्त्रियांच्या समस्या व संघर्ष

□ मीरा सावरा

वसाहतीकरणामुळे आदिवासींच्या जीवनात बरेच बदल झाले. या सर्व बदलांचा आदिवासी स्त्रीवर काय परिणाम झाला ? आदिवासी समाजाला विशिष्ट संस्कृती असते. स्त्री व पुरुष यांच्या विशिष्ट भूमिका व परस्परातील संबंध ठरलेले असतात. या भूमिका व परस्परसंबंध विशिष्ट आर्थिक पायावर उभारलेले असतात. हा आर्थिक पायाच बदलला आहे. या बदलाचे स्त्रीवर काय परिणाम झाले ? स्त्री–पुरुषातील परस्पर-संबंधात बदल झाले का ? स्त्रियांना असलेल्या अर्थोत्पादनाच्या संधी बदलल्या का ? याचा त्यांच्या जीवनावर काय परिणाम झाला ? या बदलावर स्त्रियांची प्रतिक्रिया काय ? सामाजिक चळवळींमध्ये त्या सहभागी झाल्या का ? त्यांच्या सहभागाचे स्वरूप काय व कोणत्या प्रश्नावर त्या एकत्र आल्या ? याचे विवेचन हा श्रीमती मीरा सावरा यांच्या या निबंधाचा विषय आहे. हे विवेचन त्यांनी प्रामुख्याने ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या संदर्भात केलेले आहे.

भारतातील आदिवासी स्त्रियांवर दोन प्रकारचे लिखाण आढळते. पहिल्या प्रकारात सामाजिक-सांस्कृतिक प्रथा, रीतिरीवाज यांचे वर्णन असते. येथे विवाह, लैंगिक संकेत, मातृत्व या दृष्टिकोनातून आदिवासी स्त्रीचा विचार करण्यात येतो. दुसऱ्या प्रकारात विकास प्रक्रियेच्या परिणामासंबंधी विवेचन असते. येथे आदिवासी जमातीचा एकत्रित विचार केलेला असतो. यात स्त्रियांवरील आर्थिक–सामाजिक बदलाच्या परिणामांकडे विशेष लक्ष दिलेले नसते.

या लेखात ठाण्यातील सामाजिक–आर्थिक बदलांचा स्त्री जीवनावर काय परिणाम झाला, तिचे काम आणि घर या संदर्भात चळवळींमध्ये स्त्रियांचा सहभाग काय, कसा व किती होता व त्यांचे प्रश्न काय होते याचे विवेचन केले आहे.

### अभ्यास क्षेत्राची पार्श्वभूमी :

डहाणू परिसराचे आर्थिकदृष्ट्या तीन विभाग पडतात. किनारपट्टीच्या भागात बिगर आदिवासींच्या मालकीची विकसित जमीन असून येथील आदिवासींना भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील भूमिहीन मजूर एवढेच स्थान आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील कूळकायद्यामुळे या भागातील काही जमीन आदिवासींकडे आली आहे, मात्र भांडवलाअभावी ही जमीन विकसित झालेली नाही. डोंगरपट्टीतील जमीन निकस आहे. कूळकायद्यातील त्रुटींचा फायदा घेऊन या भागातील जमिनीसुद्धा बिगर आदिवासींनी स्वतःकडे ठेवल्या आहेत. या जमिनी पडिक आहेत. भरपूर पावसामुळे गवताचे उत्पन्न खूप आहे व ते विकण्यात येते. काही आदिवासी जमिनीचे पट्टे लागवडीखाली आणतात पण उत्पन्न इतके अपुरे की त्यांना मजूर म्हणून इतरांच्या शेतावर काम करावे लागते. जंगलातील कंदमुळे खाऊन उपजीविका करणे भाग पडते, वनोत्पादनाची विक्री करावी लागते. कामासाठी स्थलांतर करावे लागते. या भागात रस्ते होताच सधन लोक पडिक जमीन विकत घेतात व त्यावर फळबागा करतात. जंगलपट्टीतील आदिवासी विकासापासून दूर आहे.

प्रत्येक भागाचे विशिष्ट प्रश्न आहेत, अर्थकारण वेगळे आहे. डोंगरपट्टीतील आदिवासी भांडवलशाही तसेच जंगलातील अर्थकारणाशी निगडीत असतो. या भागातील स्त्रियांचे प्रश्न व अर्थकारणाचा त्यांच्या जीवनावरील परिणाम याचा विचार येथे केला आहे.

हा जिल्हा वेगवेगळ्या काळात हिंदू, मुस्लिम, मराठा, पोर्तुगीज, ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली होता. जमीन महसूल व कराच्या वेगवेगळ्या पद्धतीमुळे आदिवासींच्या जमिनीचा ताबा सावकार, व्यापारी यांचेकडे गेला आहे. कमी उत्पन्न, कर्जबाजारीपणा व भरमसाठ व्याज या चक्रात आदिवासी अडकला आहे. स्वतःच्याच जमिनीवर तो कूळ झाला आहे. भूधारकांपेक्षा भूमीहिन आदिवासींची संख्या मोठी आहे. ज्यांचेकडे जमीन आहे ती कमी आहे.

### आदिवासी समाजाचे स्वरूप :

आपल्या कुटुंबाच्या उपजीविकेसाठी स्वतः काम करत असल्याने आदिवासी स्त्रिया पुरुषांवर अवलंबून

नसतात, स्वतंत्र असतात व यामुळे आदिवासी स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा आहे असा एक समज आहे. मात्र आदिवासी समाज हा खूप गुंतागुंतीचा असून त्यात बऱ्याच परस्पर विरुद्ध बाबी आढळतात.

आदिवासींमध्ये नवऱ्याला बायको मिळविण्यासाठी वधूमूल्य (देज) द्यावे लागते. पूर्वी हे वधूमूल्य भात, गायी-गुरे या प्रकारात असे, पण आता तर हा एक प्रकारचा रोखीचा व्यवहार झाला आहे. ज्याला वधूमूल्य देण्याइतकी ऐपत नाही असा नवरा बायकोच्या माहेरी घरजावई म्हणून राहतो व त्यांच्या शेतावर राबतो. येथे साहजिकच बायकोचे नवऱ्यावर वर्चस्व असते.

बिगर आदिवासी समाजातील हुंडाप्रथेच्या संदर्भात वधूमूल्याची प्रथा आदिवासी स्त्रियांच्या उच्च दर्जाची द्योतक आहे असे बऱ्याचदा म्हटले जाते. मात्र वधूमूल्याची प्रथा काही प्रश्न, अडचणी निर्माण करते. नवऱ्याने बायकोला विकत घेणे असाही वधूमूल्याचा अर्थ घेतला जाऊ शकतो. आज सासरे व नवरे बायकोला 'आम्ही तुला विकत घेतले आहे' असे बोलताना आढळतात. बायको विकत घ्यावी लागत असल्याने जमिनीची मालकी पुरुषांकडे असावी या कल्पनेला पुष्टी मिळते. घटस्फोट व पुनर्विवाह शक्य असले तरीही दुसऱ्या नवऱ्याला पहिल्या नवऱ्याचा वधूमूल्यासकट लग्नाचा सर्व खर्च द्यावा लागतो. ही रक्कम बरीच असल्याने घटस्फोटीत स्त्रियांना बऱ्याचदा इच्छा असूनही पुनर्विवाह करता येत नाही. याउलट पुरुषावर असे कोणतेही बंधन नसल्याने तो पहिल्या बायकोला न विचारता दुसरी बायको ठेऊ शकतो.

वधूमूल्य प्रथेची जमेची बाजू अशी की, जन्माला आलेल्या मुलीचे ओझे वाटत नाही कारण तिच्याकडून पैसा मिळतो. यातील नकारात्मक बाब अशी की, स्त्रियांना कोणत्याही स्वरूपाचे वारसाहक्क नसतात.

आदिवासी समाज आपले अंतर्गत प्रश्न स्थानिक पंचमंडळामार्फत सोडवतो. पंच म्हणून बसण्याचा अधिकार केवळ विवाहित पुरुषांनाच असतो, स्त्रियांना नाही. याचे कारण असे देण्यात येते की, स्त्रिया उथळ असतात, गंभीरपणे कोणताही निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात नसते. दुसऱ्या बाजूला विवाहित स्त्रियांचा दर्जा धार्मिक व कौटुंबिक समारंभात उच्च असतो; त्यांना महत्त्वाचे स्थान असते. त्याबरोबरच एक समज असा आहे की कोणतीही स्त्री ही चेटकीण असू शकते. गावातील कोणत्याही दुर्घटनेबद्दल प्रथम चेटकिणीच्या वाईट नजरेचा हा परिणाम असावा असा संशय घेण्यात येऊन अशा चेटकिणींचा शोध घेऊन त्यांना गावाबाहेर घालविण्यात येते.

आर्थिकदृष्टचा आदिवासी स्त्री स्वतंत्र असल्याने कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी तिला उचलावी लागते. पूर्वी झाडे तोडणे व शिकार ही कामे पुरुषाकडे असत तर शेतीची कामे स्त्रियांकडे असत. आदिवासी स्त्री-पुरुषातील ही पूर्वापार चालत आलेली कामाची वाटणी आजही प्रचलित असलेल्या एका प्रथेतून दिसून येते. नवजात मुलाच्या पाळण्यात जन्मानंतरच्या समारंभात कुऱ्हाड ठेवण्यात येते तर नवजात मुलीच्या पाळण्यात कोयता ठेवण्यात येतो.

कुटुंबाच्या दैनंदिन उपजीविकेची जबाबदारी स्त्रीवर असते. शेती उत्पादनाबरोबरच जंगलातून गोळा केलेली कंदमुळे, फळे, भाज्या इ. च्या साहाय्याने ही जबाबदारी स्त्रिया पार पाडतात. आजही आदिवासी स्त्रीकडून हीच अपेक्षा असते. बरेच आदिवासी पुरुष रोजंदारीवर काम करतात. त्यांची बरीचशी मिळकत त्यांची व्यसने व दारू यावरच खर्च होते अगर काही प्रासंगिक खर्चासाठी वापरली जाते. ज्यांच्या जवळ जमीन आहे अशा आदिवासी कुटुंबाची शेतीची बरीचशी कामे स्त्रियाच करतात. पुरुष फक्त नांगरणी व झोडपणी करतात. मात्र जमिनीची अधिकृत मालकी स्त्रियांकडे नसते, ती पुरुषांकडे असते. पुरुष दगावला तर मुले मोठी होईपर्यंत जमिन स्त्रीकडे असते मुलगा नसल्यास नवऱ्याचे नातेवाईक ती ताब्यात घेतात. मात्र स्त्रियांकडे जमिनीची मालकी असू नये असा कायदा मात्र आदिवासींमध्ये कुठेही आढळत नाही. समाजात चांगले वजन असणारी महिला मजुरांच्या साहाय्याने अथवा घरजावई मिळवून जमीन कसते.

**वारल्यांच्या उठावातील स्त्रियांचा सहभाग :**

१९४५–४७ दरम्यान झालेल्या वारल्यांच्या उठावात, चळवळीत सुरुवातीपासूनच आदिवासी स्त्रियांचा सक्रिय सहभाग होता. बाहेरच्यांकडून आदिवासी स्त्रियांवर होणारे अत्याचार व जुलूमजबरदस्ती हे या चळवळीतील ज्वलंत प्रश्न होते. या व बांधील

मजूर-पद्धत नष्ट करण्याच्या प्रश्नावर आदिवासी स्त्री-पुरुष एकत्र आले. हा लढा प्रामुख्याने सरंजामशाही मनोवृत्तीचे जमीनदार, सावकार विरुद्ध आदिवासी समाज असा होता. आदिवासींच्या अस्मितेचा प्रश्न उद्भवल्यामुळे हा लढा प्रामुख्याने बिगर आदिवासींविरुद्ध होता. बाहेरच्यांकडून केले जाणारे आदिवासींचे शोषण अधिक तीव्र व कठोर स्वरूपाचे व त्यांना स्वतंत्र जीवन नाकारणारे असल्याने आदिवासी समाजातील अंतर्गत प्रश्न या चळवळीत पुढे आले नाहीत.

**कष्टकरी संघटनेचे कार्य :**

१९७० च्या आसपास महाराष्ट्राच्या आदिवासी भागात पक्षातीत दृष्टिकोनातून कार्य करणाऱ्या अनेक ध्येयवादी व निरलस कार्यकर्त्यांनी आदिवासींना संघटित करण्याचे व त्यांच्या हक्कांसाठी झगडण्याचे कार्य सुरू केले. कष्टकरी संघटना या अशाच एका जनजागरण गटाने ठाणे जिल्ह्यातील डहाणू, तलासरी भागात काम सुरू केले. जनशिक्षण, जनजागृती, जनकार्य, जनसंघटना, जनशक्ती अशी संघटनेच्या कामाची पंचसूत्री होती. संघटनेमध्ये महिला कार्यकर्त्याही असल्याने आदिवासी महिला सहभागी होऊ लागल्या. संघटनेच्या एका पुरुष कार्यकर्त्याने मान्य केले की सुरुवातीपासूनच आदिवासी स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या व त्यांनी प्रमुख वाटा उचलला. कित्येक वेळा पुरुष कार्यकर्ते पळून जात पण स्त्रिया चिकाटीने लढल्या. त्यांच्या डोळ्यात भीतीचा लवलेशही दिसला नाही. एका महिलेच्या मागणीवरून वेगळा महिला विभाग काढण्यात आला.

प्रामुख्याने कोणत्या प्रश्नांवर आदिवासी स्त्रिया पुढाकार घेत होत्या ? स्थानिक व्यापारी व दुकानदार यांचेविरुद्ध स्त्रियांनी संघर्षाची भूमिका घेतली आहे. एप्रिल १९७९ मध्ये एक आदिवासी स्त्री गावातील दुकानात काही सामान घेण्यासाठी गेली असता वजनावरून झालेल्या वादात दुकानदाराने तिच्या लुगड्याला हात घालून विनयभंग केला. स्त्रियांनी एकत्र येऊन सभेत मागणी केली की दुकानदाराने त्या महिलेच्या पाया पडून माफी मागावी व ५० रु. दंड द्यावा.

स्थानिक पातळीवरील सरकारी नोकर आदिवासी स्त्रियांना वारंवार त्रास देत असतात. एप्रिल १९७९ मध्ये उधवा भागातील रेंज फॉरेस्ट ऑफिसर जंगलातील लाकडाच्या चोरीच्या तपासासाठी शिसने गावात आला. शोध घेता घेता तो गुलाब धांगडा हिच्या घरात आला. गुलाब घरात एकटीच होती. त्याने तिला हाताने पकडून घराच्या आतील भागात ओढत नेले. तिने आरोळी ठोकली. ती ऐकून गावातील स्त्रिया तिच्या मदतीला धावत आल्या व त्यांनी त्याला पळवून लावले. त्याने संघटनेविरुद्ध खोटा पुरावा दाखल करून फिर्याद लावली. काही कार्यकर्त्यांना अटक झाली. दरम्यान गुलाबनेही पोलिसांत तक्रार नोंदवली. त्यानंतर त्याने त्या भागातून बदली करून घेऊन तो भाग सोडला.

या भागात सुरुवातीस ग्रामीण रोजगार हमी योजनांतर्गत स्त्रियांना काम दिले जात नसे. संघटनेने आयोजित केलेल्या स्त्रियांच्या अनेक मोर्च्यानंतर व संघर्षानंतर त्यांना काम देण्यात येऊ लागले. त्यातही त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते, अनेकदा पूर्ण पगारही मिळत नाही. एका अहवालात सुचविण्यात आले आहे की दारिद्र्यामुळे बऱ्याच आदिवासी स्त्रियांना वेश्याव्यवसाय करणे भाग पडते. दलाल लोक मुलींना ट्रकमधून शहरात घेऊन जातात.

नवरे बायकांना दारूच्या नशेत शिव्यागाळ व मारझोड करतात याचा गंभीरपणे विचार करण्यात येतो हे एका घटनेवरून दिसून येईल. जंगलखात्याने एका आदिवासीला मजुरीत फसविले. याचा राग त्याने परतताना आपल्या बायकोवर काढण्यास सुरुवात केली. एका बाईने त्याला हटकले तेव्हा तो म्हणाला, 'मी माझ्या बायकोला शिव्या देत आहे, यात तुझा संबंध काय ?' तिने त्याला उत्तर दिले 'बाई म्हणून प्रथम ती माझी बहीण आहे, नंतर तुझी बायको आहे. या गोष्टी तुला थांबवाव्या लागतील.' दुसऱ्या दिवशी तिने आणखी काही बायकांना बरोबर घेऊन त्याच्या घरी जाऊन हेच पुन्हा बजावले.

नवरा बायकोचे झगडे बऱ्याचदा दारूच्या अतिसेवनाने होतात. त्याचे पर्यावसान नवऱ्याने बायकोला मारझोड करण्यात होते. या दारूच्या धंद्यात काही बायकाच असल्याने हा प्रश्न गुंतागुंतीचा झाला आहे. गावभर फिरून दारूची भांडी

फोडण्यात येतात. काही बायकांना नाईलाजाने हा व्यवसाय करावा लागतो, त्याला पर्याय शोधणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून दारूच्या व्यसनावर नियंत्रण करण्याचे प्रयत्न संघटना करत आहे.

**निष्कर्ष :**

सर्वसाधारणत: असा समज आहे की आदिवासी समाजातील स्त्रीपुरुष परस्पर संबंध समानतेच्या पायावर आधारलेले असतात. मात्र प्रत्यक्षात या समाजात अंगभूत परस्परविरोधी बाबी, असमानता आढळते. आदिवासी स्त्रिया शेतावर सर्व प्रकारचे काम करीत असतानाही जमिनीचे मालकीहक्क त्यांचेकडे नसतात. त्यांना पंच म्हणून बैठकीत भाग घेता येत नाही. कोणत्याही विवाहीत स्त्रीवर ती चेटकीण असल्याचा संशय घेण्यात येऊन त्यांना छळण्यात येते.

एका विशिष्ट अर्थव्यवस्थेच्या चौकटीत आदिवासी संस्कृती विकसित झाली आहे. भरपूर जमीन उपलब्ध असताना आपण व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यास स्त्रिया समर्थ होत्या. विवाह व घटस्फोटा-संबंधीच्या नियमांना मजबूत आर्थिक पाया होता. तो आता पूर्णत: बदलला तरीही कुटुंबाचे पालनपोषण करण्याची अपेक्षा स्त्रियांकडून आहेच. दुसऱ्या नवऱ्याला पहिल्या लग्नाचा पूर्ण खर्च पहिल्या नवऱ्याला द्यावा लागत असल्याने इच्छा असूनही पुनर्विवाह करणे आदिवासी स्त्रियांना कठीण होते. पुरुष मात्र एकापेक्षा अधिक बायका ठेवू शकतो, त्याच्यावर बंधने नाहीत.

आदिवासी स्त्रियांना तीन प्रकारच्या दडपशाहीला, अन्यायाला तोंड द्यावे लागते.

१. आदिवासी समाज बाहेरील समाजापासून सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न आहे. बाहेरील लोकांविरुद्ध आदिवासी स्त्रीपुरुष एकत्र येऊन लढा देतात. येथे आदिवासींच्या अस्मितेचा प्रश्न असल्याने ती आदि-वासींची चळवळ बनते. अशा चळवळींमध्ये आदिवासी समाजांतर्गत विषमता व दडपशाहीचे प्रश्न मागे पडतात.

२. अर्थोत्पादनामध्ये आदिवासी 'वर्ग' म्हणून वेगळा पडतो. त्यातून उद्भवणाऱ्या सर्व सदस्यांना पुरुषांपेक्षा अधिक तीव्रतेने तोंड द्यावे लागते. कमी मजुरी, स्त्री म्हणून होणारे अत्याचार, अन्याय या त्यातील काही समस्या आहेत.

३. आदिवासी समाजांतर्गत स्त्रियांना पक्षपाती वागणूक देण्यात येते. कुटुंबांतर्गत असमानता असतेच. कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी असूनही नवऱ्याचा छळ त्यांना सहन करावा लागतो.

दारूचे अतिसेवन व नवऱ्याकडून होणारी मारझोड याविरुद्ध स्त्रिया झगडा देत आहेत. मारझोडीपासून स्त्रियांचा बचाव होण्यासाठी व असे प्रकार होऊ नयेत यासाठी गावातील स्त्रिया संघटित होतात. स्त्रिया या कुटुंबाच्या आरोग्याच्या रक्षणकर्त्या म्हणून पिढ्यान् पिढ्या जबाबदारी सांभाळत आल्या आहेत. स्त्रियांनी शासनाच्या आरोग्याधिकाऱ्यांनी रोगापासून बचाव करण्यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी अशी मागणी करण्यात पुढाकार घेतला आहे. लग्नसमारंभात स्त्रियांकडे महत्त्वाची भूमिका असे परंतु दिवसेंदिवस लोकप्रिय होत असलेल्या सामुदायिक विवाहपद्धतीमुळे मात्र विवाहातील स्त्रियांचे महत्त्व कमी होत आहे.

नवऱ्याकडून बायकोवर होणारे अन्याय, अत्याचार इ. प्रश्न जरी पुढे येत असले तरी स्त्रियांचा जमिनी-वरील मालकीहक्क, पंचमंडळात भाग घेण्यास मनाई इ. प्रश्न मात्र अजूनही पुढे आलेले नाहीत. ते पुढे येणे आवश्यक आहे.

विशिष्ट सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीवर विशिष्ट प्रकारच्या प्रतिक्रिया व सामाजिक चळवळी उद्भव-तात. या चळवळीतील स्त्रियांचा सहभाग त्या चळवळीत कोणते प्रश्न हाताळले आहेत यावर अवलंबून असतो. चळवळीचा रोख प्रामुख्याने बाहेरील हितशत्रूविरुद्ध असेल तेव्हा आदिवासी स्त्रीपुरुष एकत्र येऊन दडप-शाहीविरुद्ध लढा देतात. मात्र यामुळे समाजांतर्गत दडपशाहीचे प्रश्न उपस्थित करणे अवघड होते. उत्पादनात भांडवलशाही हितसंबंध विकसित झाल्याने वर्गीय प्रश्न पृष्ठभागावर येतात मात्र समाजांतर्गत अन्याय, विषमता, दडपशाहीचे प्रश्न मागे पडतात.

**स्वैर अनुवाद – सुधीर जोग**

# विश्वास बसेल तुमचा यांवर ?

□ कुसुम नारगोलकर

पंधरा वर्षांपूर्वीची घटना आहे. आम्ही दिल्लीहून परतलो होतो. दीड दिवसांचा रेल्वेचा प्रवास घडल्यामुळे संध्याकाळ झाली होती तरी मी आंघोळ करण्याच्या गडबडीत होते. इतक्यात समोरच्या बागेच्या कुंपणाबाहेरून किंचाळचा ऐकू आल्या, मारण्याचा आवाजही आला. मी झोपडीच्या ओटयांवर गेले. धावजी, शिराड हे वसतिगृहातले विद्यार्थी बिचकत बिचकत बाहेर जाऊ पहात होते, काहीजण अगोदरच पुढे गेले होते.

'काय झालं रे ? कोण मारतंय ?'

'बारकीला तिचा मामाच मारतोय ?'

'का बरं ? काय केलं तिनं ?'

'ती भुताळी कबलत (कबूल होत) नाय मन्हून' असं मला सांगत सांगत शिनवार बाहेर निसटला. मीही त्याच्यामागे आवाराच्या झाप्यापर्यंत गेले. समोरून भीवा दसवत येत होता. तो मुलीला घेऊन घरी चालला होता. असेल ७/८ वर्षाची ती मुलगी. मला पाहिल्यावर भिवाने खाली मान घातली. त्याचा चेहेरा उतरलेला होता, त्याने हातावर घेतलेली मुलगी मलूल निपचित होती. आमच्याशी काही न बोलता एखाद्या अपराध्यासारखा तो सटकला.

'तिचा जिवडा (जीव) आथां निघून जॅल' छोटया लहूने आपण होवून मला सांगितलं. तोपर्यंत वसतिगृहातील बरीच मुलं तिथं गोळा झाली. पण सगळ्यांचं म्हणणं आम्ही फार पुढे जाण्यात अर्थ नाही. म्हणून आम्ही झोपडीकडे परतलो. बारकीला घेऊन तिचे मामा त्यांच्या नदीपलिकडच्या झोपडीजवळ पोचले असावेत. तिचं ओरडणं क्षीण होत होत ऐकू येइनासं झालं होतं.

**गावात आजार उद्‌भवतात :**

दिल्लीला जाण्यापूर्वी १०/१२ दिवस पाडयावरच्या स्त्रिया, मुली जरा घाबरल्यासारख्या वाटत होत्या. नेहमीचं मनमुराद हंसणं, खिदळणं, थट्टा–मस्करी करणं कमी झाल्यासारखं भासू लागलं. कामाला जाताना, कामावरून परतताना, विहिरीवर पाणी भरायला जमल्यावर, नदीवर आंघोळीला गेल्यावर ४/६ जणी एकत्र आल्या की नेहमी कसे हास्यविनोदाचे फवारे उडतात, निर्व्याज आनंद बघायला मिळतो. कोणी अर्धपोटी असते, कोणाचे कपडे फाटलेले असतात, एखादीचा नवरा दारू पिऊन तिला मारत असतो; पण या सगळ्या परिस्थितीवर सहजपणे मात करून त्या नित्य साध्यासुध्या गोष्टीत जीवनाचा आनंद लुटताना आढळतात. पण आता मात्र त्या मला धास्तावल्यागत वाटत होत्या. कारणाची कुणकूण मला लागली होती. शेवटी जवळच्या २/३ जणींना मी विचारलं. पण भीतीपोटी त्यांची उत्तरं तुटकच होती !

'कोणी आजारी पडावं, कोणाचं वाईट व्हावं, कोणी मेलं तर बरं अशा काही इच्छा तुम्ही बाळगत नाही ना ? मग उगीच कशाला भिता ? तुम्हाला कोणी त्रास देणार नाही' असं म्हटल्यावर त्यांना काही दिलासा वाटत नव्हता. आपण कुणाचं वाईट चिंतीत नसलो तरी भगताने जर आपल्याला 'भुताळी' म्हटलं तर त्याच्यापुढे आपले काय चालणार, गावकरी त्याचाच निर्णय प्रमाण मानणार अशा भीतीने त्यांना ग्रासलं होतं.

त्याचं असं झालं होतं की गावात २/३ महिने बरेच आजार उद्‌भवले होते. सर्व प्रकारचे जंतू तर पाचवीलाच पुजलेले. मलेरिया, आमांश, सर्दी–खोकला सगळेच रोग बळावले होते. आम्ही आपलं गावातल्या सगळ्या विहिरींत पोटॅशियम टाकलं; कृमि, हिंवताप, सर्दी, जुलाब सगळ्यांवरची प्राथमिक औषधं वाटली. आरोग्य विभागाकडे कळवून मुद्दाम डी. डी. टी. ची घरोघर फवारणी करवून घेतली. पण गावकऱ्यांच्या मनावर या साऱ्या उपचारांचा फारसा परिणाम झाला नाही. औषधं घेण्याकडे किंवा डॉक्टरांकडे जाण्याकडे त्यावेळी त्यांचा फारसा कल नसे. कोणी आजारी पडलं की त्याच्या अंगावरून भाताचे किंवा तांदळाचे दाणे ओवाळून ते भगताकडे घेऊन जात. भगत म्हणजे पुरोहित, ज्योतिषी, डॉक्टर सर्व काही असतो.

त्याच्याकडे दाणे घेऊन जाण्याच्या 'खडी पहाणे' म्हणतात. त्यानंतर तो भगत सांगेल ते उपचार आजाऱ्यावर केले जातात.

## बायाच भूतखेत करतात ही ठाम समजूत :

दुर्दैव असं की, योग्य वेळी वैद्यकीय उपचार करवून घेण्याचं टाळल्यामुळे आणि अडाणीपणाचे उपचार करीत राहिल्यामुळे पाड्यावर ४/५ जण दगावले–झालं ! पुरुष मंडळींची खलबतं सुरू झाली. सामूहिकरीत्या गावदेवाची पूजा झाली. त्यांच्यासाठी घरोघर हिंडून वर्गणी गोळा केली गेली. गावदेवाला संतुष्ट करण्यासाठी रानडुक्कर बळी देऊन झालं. तरीही रोगराई आटोक्यांत यायची चिन्हं दिसेनात. इतकंच नव्हे तर गावप्रमुखाची सूनच मृत्यूमुखी पडली ! तेव्हा मात्र सगळ्यांची खात्री झाली की, कोणी तरी



भुताटकी, चेटूक करीत असावं, म्हणून माणसं मरतात आणि बायाच भूनखेतं करतात हीही त्यांची ठाम समजूत.

पुन:पुन्हा: पाड्यावरच्या म्होरक्यांच्या सल्लामसलती सुरू झाल्या. शेवटी गुजराथमधल्या वापीहून मोठ्या भगताला बोलावून आणायचा निर्णय ठरला. वारल्यांचं जग मर्यादितच. वसई, विरार ते उंबरगाव, बलसाड आणि डहाणू ते जव्हार, मोखाडा, तळासरी उधवा या क्षेत्राच्या बाहेरच्या जगांत फारसे संबंध, सगेसोयरे नाहीत. त्यामुळे जाणंयेणंही नाही म्हणून त्यांना मोठ्ठा 'कन्सल्टन्ट्' सुद्धा वापीचाच ! त्या वापीच्या भगताने म्हणे पूर्वी उंबरगाव तालुक्यांतल्या एका गावी 'भुताळी' (डाकीण) हुडकून काढली होती ! म्हणून त्या गांवांतली इडापिडा टळली होती ! !

तेव्हा कैनाडच्या या पाड्यावरच्या प्रमुख गांवकऱ्यांचं 'शिष्टमंडळ' वापीला रवाना झालं. तिथला तो भगत सहजासहजी थोडंच यायचं कबूल करणार ? त्याला येण्याजाण्याचा प्रवासखर्च आणि वर काही दक्षिणा द्यायचं आश्वासन दिलं गेलं आणि त्याचा कैनाडला येण्याचा दिवस निश्चित करून गावकरी परतले.

## भगताच्या आदेशापुढे स्त्रिया हतबल होतात :

इकडे पाड्यावर सगळ्या स्त्रियामुलींना सक्त ताकीद मिळाली होती. कोणी गाव सोडून बाहेर जायचं नाही. गावातल्या आणि घरातल्या सर्वच पुरुष मंडळींची आज्ञा मोडण्याचा विचार कुणा बायांच्या मनात आला नाही. आर्थिकदृष्ट्या एरव्ही स्वतंत्र असलेल्या, कुटुंबात नवरा, मुलंबाळं यांच्यावर सत्ता गाजवणाऱ्या, नवरा दारू पिऊन त्रास द्यायला लागला तर भावना, प्रतिष्ठा, अब्रू वगैरेंचा फारसा बाऊ न करता स्वत:चा स्वाभिमान संभाळण्यासाठी नवऱ्याला सोडून बाणेदारपणाने निघून जाणाऱ्या या मानी स्त्रिया; पण भगताच्या आदेशापुढे हतबल झाल्या होत्या ! भगत येणार त्याच्या आदल्या दिवशी सायंकाळी सर्व स्त्रिया–मुलींना उपवास करण्याचं फर्मान निघालं. प्रत्यक्ष त्या दिवशी सकाळी तर चहासुद्धा घ्यायचा नाही, असं त्यांना सांगण्यात आलं. त्या हुकमाविरुद्ध ब्र काढण्याची कोणाची छाती नव्हती. सकाळी आंघोळ करून नशिबाचा कौल पाहाण्यासाठी नियोजित ठिकाणी सगळ्या मुकाट्याने जाऊ लागल्या. पाड्यावरचे सगळेच अबालवृद्ध गावाबाहेर एका

टेकडीच्या पायथ्याशी जमा झाले. या ठिकाणाचा सुगावा कोणाला लागू नये याची खबरदारी घेण्यात आली होती.

ज्यावेळी तो भगत आला तेव्हापासून गावातले २/३ शिकावू तरुण भगत त्याच्या दिमतीला होते. गावप्रमुख आणि चार प्रतिष्ठीत नागरिकांबरोबर त्याने विडी फुंकली, ऐटीत गप्पागोष्टी केल्या आणि मग मुळ्या, पाला वगैरे गोळा करायला सुरवात केली. स्वतःच्या पोतडीतून त्याने काही चिजा काढल्या. अनेक प्रकारच्या पाल्यापासून त्याने एक रसायन तयार केलं. सगळ्यांच्या नजरा त्याच्या बारीक सारीक हालचालींकडे लागलेल्या होत्या. सगळी पूर्वतयारी झाल्यानंतर त्याच्या दरबारात स्त्रियांना पाळीपाळीने उभे करण्यात येऊ लागलं. ते रसायन त्या बायांना प्यायला सांगताना तो भगत खुबीने त्या त्या बाईच्या कोणातरी पुरुष नातेवाईकाला ते द्यायला लावीत होता, स्वतः देत नव्हता.

रसायन प्यायल्यानंतर त्या स्त्रियांना उन्हांत बसवलं गेलं. हळूहळू त्या बेभान होऊ लागल्या. त्यांचे नातेवाईक भगताचे हुजरे त्या स्त्रियांना चाबूक दाखवून किंवा क्वचित एखाद्या फटकारा देऊन ओरडून विचारीत, ' सांग, गो सांग काय भूतां केलीस ? कोणा कोणाला खाऊन टाकलंस ? आथां कोन्हाला मारायां हेरलं ?" ती बिचारी काय सांगणार ? कोणी काही केलेलंच नव्हतं. तर त्या काय बोलणार ? पण बेहोषीमुळे कोणी केस मोकळे सोडीत, कोणी हातवारे करीत, कोणी झाडांकडे वळून झाडांशीच भांडत तर कोणी दगड मारीत सुटत होत्या. रसायनाचा अंमल जसजसा चढत गेला तसतशी अनेक स्त्रियांची बेहोषी वाढत गेली, क्वचित एखाद दुसरीला भान न राहिल्यामुळे ती विवस्त्रही बनली. त्या त्या बायांचे नवरे, वडील, भाऊ, काका, मामा, मुलगे यांना ते दृश्य बघवत नव्हतं. पण गहिवरून आलं तरी आवंढा गिळून गप्प रहावं लागत होतं आणि त्या त्या स्त्रियांबद्दल राग चीड व्यक्त करून दाखवावी लागत होती !

रसायनाची उग्रता सहन न झाल्यामुळे कित्येकजणी अस्वस्थपणे लोळू लागल्या, काहींचा झपाट्याने शक्तीपात होऊ लागला. त्या भगताच्या अघोरी कृत्यांत सहभागी झालेले निवडक म्होरके सोडले तर बाकी सर्व पुरुषांना आपापल्या स्त्रियांची ती दयनीय अवस्था बघवेना, म्हणून ते चिंताक्रांत झाले. काहींनी लाजेने माना खाली घातल्या.

## चार निरपराध स्त्रिया प्राणाला मुकल्या :

हे सर्व भयानक नाट्य त्या दिवसापर्यंत अत्यंत गुप्तपणे हाताळलं गेलं होतं. परंतु त्या दिवशी प्रत्यक्ष काम सुरू झाल्यावर सर्व पात्रे त्यांत गुरफटलो गेली आणि दूरदूरच्या पाड्यांपर्यंत कर्णोपकर्णी वार्ता पसरली. बघ्यांची संख्या गोळा होऊ लागली. इतका सगळा खटाटोप करूनही कोणतीही स्त्री भुतेखेते चेटुक करणारी ' डाकोण ' म्हणून हुडकून काढता आली नाही ! कितीही बेहोष बनल्या तरी कोणीच स्त्रिया म्हणेणात की आम्ही दुसऱ्यांवर ' करणी ' केली. त्यामुळे त्या मोठ्या भगताची निराशा झाली. लोकांचा जमाव पाहून त्यांने काढता पाय घ्यायचं ठरवलं आणि हळूच तिथून पोबारा केला. पण या सर्व प्रकरणात रसायनाची तीव्रता सहन न झाल्यामुळे अंगाचा दाह होऊन चारजणी हकनाक प्राणाला मुकल्या ! मला भेटलेल्या भिवाची मुलगी ही त्यात सर्वात लहान होती आणि भिवाच्या शेजारीच रहाणारी बाबल्या कोरडाची आई सर्वात वयस्क (पन्नाशीच्या सुमाराची) होती.

अंधश्रद्धेने चार बायांचे बळी घेऊन पाशवी वृत्तीचं उघडं नागडं प्रदर्शन मात्र घडवलं, पण गावातली रोगराई शमली नाही ती नाहीच. कशी शमणार ? रोगराई आणि भुताटकी यांचा काही अर्थाअर्थी संबंध थोडाच होता ?

चार जणींच्या मृत्यूची वार्ता दडविण्याजोगी नव्हती. पोलिसांपर्यंत डहाणूला बातमी पोचली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतले आणि रसायन पाजलेल्या सर्व स्त्रियांना ट्रकमधून डहाणूला नेऊन त्यांच्यावर औषधोपचार केले. त्या भगताला हे सर्व समजलं. त्याने पोलिसांना गुंगारे देण्याचे खूप दिवस प्रयत्न केले पण अखेर तो पकडला गेला, त्याच्यावर केसही चालविण्यात आली. विचित्र योगायोग असा की केस अर्धवट चालू असतानाच तो भगत मरण पावला !

— **कुसुम नारगोलकर**
आदिवासी ग्रामसेवा संघ, कैनाड
कैनाड द्वारा डहाणू रोड, जि. ठाणे
(पश्चिम रेल्वे), महाराष्ट्र
पिन — ४०१६०२

# महिला कार्यकर्त्यांचे चर्चासत्र

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व आदिवासी जाणीव जागृती केंद्र, पुणे यांनी संयुक्तपणे आयोजित केलेले महिला कार्यकर्त्यांचे चर्चासत्र दि. १२ मार्च ते १५ मार्च १९८५ रोजी पुणे विद्यापीठातील समदाज सभागृहात झाले. या चर्चासत्राचे प्रास्ताविक श्री. शरद कुलकर्णी यांनी केले. ते म्हणाले परिवर्तनाची चळवळ पुढे नेण्यासाठी ग्रामीण व शहरी भागांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर स्त्रिया सहभागी होताहेत यातून एक प्रश्न उभा रहातो. स्त्रियांचा सहभाग असे कधी म्हणायचे ? त्यांच्या मोठ्या संख्येला की, त्या जेव्हा आपली निर्णय-शक्ती वापरतात तेव्हा ? परिवर्तनाच्या चळवळींतर्गत उभरणारे दुसरे काही प्रश्न असे आहेत की, ज्या परिवर्तनवादी संघटनात स्त्री-पुरुष कार्यकर्ते दोन्ही काम करत आहेत त्या संघटनेतर्गत कार्यकर्त्या स्त्री-पुरुषांच्या नात्याची रचना कशी असते ? संघटनेत स्त्री कार्यकर्त्या असल्या तर त्या जास्त संख्येने स्त्रियांना संघटनेकडे आकृष्ट करू शकतात म्हणूनच त्यांचे मोल कां ? की संघटनेतर्गतच विविध बाबींत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने निर्णय घेतात की त्यांच्याकडे फक्त काही विशिष्ट प्रकारची बालवाडीसारखी कामे जास्त प्रमाणावर सोपवल्या जात रहातात ?

महिलांच्या संघटनांविषयी आपले काय विचार आहेत. याचा पुन्हा ऊहापोह होणे जरुरीचे आहे. समाज प्रचलित असलेल्या पुरुषप्रधान विचारप्रणाली-पासून परिवर्तनाची चळवळ सुटू शकलेली नाही हे सत्य आहे. या सर्व परिस्थितीत चळवळ कितीशी अंतर्मुख बनू शकलेली आहे हे पहाता आले पाहिजे.

महिला कार्यकर्त्यांच्या कामाच्या ठिकाणी, पुरुष कार्यकर्त्यांपेक्षा वेगळे असे अनेक प्रश्न उद्भवतात. गावातील प्रतिष्ठित मंडळींनी त्यांना त्रास देणे, कुठल्याही कार्यकर्तीचे चारित्र्यहनन करून तिचे काम ठप्प करणे, एकंदर समाजाच्या दृष्टिकोनामुळे त्यांना अधिक सोपे जाते

तसेच कुटुंबव्यवस्था स्त्रीला दुय्यम स्थान देते व धार्मिक समजुतींमुळे आजही चेटकीण म्हणून स्त्रियांना जाळल्या जाते. तेव्हा ज्या स्त्रियांमध्ये काम करायचे त्यांचे प्रश्न कोणते व वेगळ्या वर्गातून वा त्याच वर्गातून आलेल्या स्त्री कार्यकर्त्यांचे प्रश्न; पण स्त्रिया म्हणून कशाप्रकारे आतून निगडीत होतात. अशा प्रश्नांना सामोरे जाऊन महिलांना संघटित करायचे कसे हा अजून एक महत्त्वाचा मुद्दा. यासारख्या महिलांच्या प्रश्नाच्या विविध बाजू डोळ्यासमोर याव्या म्हणून, चर्चासत्र आहे असे श्री. शरद कुलकर्णी प्रास्तविकाच्या शेवटी म्हणाले, यानंतर शिबिरार्थींनी परस्पर परिचय करून घेतला.

परस्पर परिचयाच्या कार्यक्रमानंतर गं. बा. सरदार म्हणाले, माझ्या डोळ्यापुढे आज स्त्रियांच्या चार पिढ्या दिसताहेत; पण स्त्री कार्यकर्त्यांची पिछेहाटच होताना दिसते आहे. स्त्रीमुक्त होईल तेव्हाच दलित खरा मुक्त होऊ पावेल कारण दलित व आदिवासी हा सर्वात शोषित वर्ग जेव्हा घरात पत्नीवर हुकमत गाजवतो, तेव्हा स्त्री-पुरुष मुक्तीचे चित्र केवढे गुंतागुंतीचे आहे ते दिसून येते. वर्गलढ्यात निदान शत्रू कोण व मित्र कोण हे कळणे सोपे आहे. पण स्त्री पुरुषांच्या लढ्यात जास्त वळणं-वाकणं, वेगळे बंध आहेत. त्यामुळे तिथे स्पष्ट अशा रेषा आखता येत नाहीत. याकरता अतिशय भयानक परिस्थिती आहे असं जे म्हणतात तेच जागृत आहेत असं समजावं. एरवी याबाबत डोळ्यावर कातडे ओढून बसणारेच जास्त आहेत.

यानंतर श्रीमती लीला चितळे यांनी अध्यक्षपदाची सुत्रे हातात घेऊन सर्व सहभागींना आपले अनुभव मांडायची विनंती केली. बहुतांश कार्यकर्त्या वेगवेगळ्या प्रकारच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक अशा क्षेत्रात काम करणाऱ्या होत्या. तेव्हा त्यांनी या सर्व संस्था संघटना कशा बांधल्या गेल्यात, त्यात काय अडचणी आल्यात व काम चालू ठेवावं अशी प्रेरणा कशातून मिळत गेली याविषयी आपले अनुभव सांगावे अशी अपेक्षा होती.

प्रथम छायाताई सुरतवंती बोलल्या. त्या धुळे जिल्ह्यात शहादा तालुक्यात काम करतात. त्यांनी प्रथम या भागातील अंबरसिंग महाराज सुरतवंती यांच्या कामाची पार्श्वभूमी सांगितली. अंबरसिंग महाराज सातपुडा सर्वोदय मंडळ, धडगाव येथे जीप ड्रायव्हर होते. मंडळ दहा बालवाड्या चालवते. जीप घेऊन वेळोवेळी भेट द्यायला जावे लागे. यातून पाड्या-पाड्यावरच्या बायांशी ओळख वाढली. अन् मग त्यांच्या सोबतीनं छायाताई काम करू लागल्या. महिला मंडळं सुरू केलीत. सभा घेऊन बायांना त्यांचे प्रश्न समजावून देण्याची रुजुवात झाली. दरम्यान १९७१ साली पाटीलवाडी प्रकरण झालं. पाटीलवाडीत दरोडा पडून त्याचं नेतृत्व अंबरसिंग महाराजांनीच केलं असा खोटा पुरावा करण्यात आला. हा प्रयत्न सपशेल फसला तरी त्यातून मनस्ताप झालाच. दरम्यान महाराजांच्या जन्मगावी पाडळदे इथे, एक भयानक प्रकार घडला. तिथे बाया शेतावर शेंगा वेचण्यासाठी गेल्या होत्या. पिकं राखण्यासाठी तिथं सावकारानं वॉचमन नेमलेला होता. त्याने बायांना शेंगा वेचताना पकडलं. त्यात पाच मुली होत्या. त्यांना तीन दिवस ग्रामपंचायत ऑफिसात कोंडून ठेवण्यात आलं. त्यांच्यावर अत्याचार करण्यात आला. मारझोड झाली. जे गांवकरी जाब विचारायला आले ते पण मारहाणीच्या सत्रातून सुटले नाहीत. मुली दंड देत नाहीत म्हणून त्यांना कोंडून ठेवलंय, असं गुर्मीतलं उत्तर मिळालं. शेवटी आदि-वासींनी मुलींना सोडवून आणलं. महाराजांची सख्खी मावशी १।। महिन्याची बाळंतीण असताना तीवर बलात्कार झाला. हा जुलुम करणारे पळून गेलेत. यानंतर पाडळदयात दंगा झाला. घोड्यावर बसून भाले घेऊन श्रीमंत शेतकरी अंगावर चालून आले. पाडळदयाचे लोक भयानं गारठून व जीव मुठीत घेऊन पळून गेले. शहादयाला जाऊन नदीच्या कारड्या पात्रात पाल टेकून राहीले. त्यांचा काही ठावठिकाणा राहीला नाही. त्यावेळी बेदम मारहाण झालेला एकजण अजून जिवंत आहे. त्याला इतकं बदडलं ते सहन न होऊन त्याने विहिरीत उडी टाकली तर त्याला विहिरीबाहेर काढून घोड्यांच्या टाचांना बांधून फरफटवण्यात आलं.

या परिस्थितीत पाडळदयाच्या मुलींनी रडून रडून आकांत करून अंबरसिंग महाराजांना म्हटलं की, "तुम्ही आमच्या गावची शिकलेली मुलं आहात, तुम्ही काहीतरी बंदोबस्त करा." महाराजांनी प्रकरणाचा छडा लावला. त्यांच्या लक्षात आलं की अत्याचार करणाऱ्यांवर साधा खटलाही भरला जाऊ शकत नव्हता. मग लोकांना एकत्र करून महाराजांनी विचार केला, स्वच्छ दिसू लागलं की धडगावला डोंगरात राहून पाडळदया शहाद्याचं (जिथं गुजर पाटील जास्त आहेत) काम व्हायचं नाही व मग ते धडगाववरून खाली उतरले. महाराज कफल्लक होते. पण गावच्या लोकांनी खूप मदत दिली, उडीद, मूग या डाळी, धान्य दिलं. पाडळदयाची घटना निर्णायक ठरली. हळूहळू महाराजांचं काम उभं रहात गेलं. त्यात लोकांचा हातभार मिळत गेला.

महाराज भजनाच्या माध्यमातून काम करत. यातूनच लोक जवळ येत गेले. महाराजांनी छाया-ताईंना या दरम्यान सतत कामाला प्रवृत्त केलं. चळवळीला-मुलांच्या शिक्षणाचा पाया हवा. ही जाणीव छायाताईंत आली. अंध मुलांची पण एक शाळा काढण्यात आली.

## हा जुलूम सोसायचा नाही :

दरम्यान स्त्रियांना महाराजांनी कानमंत्र दिला की, मालक लोक बायांवर अत्याचार करतात. गवतकापणीला गेलं की शेतात धरतात, बलात्कार करतात. हा जुलूम सोसायचा नाही. इंदिरा गांधी बाहेर कामाला जाते तेव्हा तिच्याभोवती पोलिसांचं कोंडाळं असतं पण आपल्याला राखायला पोलीस नाही. मग अशा वेळी आपला विळा आहे. तोच उगारायचा. विळा उगारला तर पुरुष जवळ येणार नाहीत. या शिकवणीनंतर जंगल सत्याग्रह, वेठबिगार यासारख्या कार्यक्रमांत बायांचा सहभाग भराभर वाढला. मात्र सरकारी लोकांनी 'विळा तयार राहू दे' म्हटलं म्हणून आक्षेप घेतला. इंदिरा गांधींचं नांव वापरून महाराज बायांना चिथावणी देतात असा त्यांच्यावर आरोप झाला; पण ते डरले नाहीत. महिला मोठ्या प्रमाणावर घराबाहेर येऊ लागल्यावर संघटनेने दारूबंदीचा कार्यक्रम हाती घेतला

**आजवर मुक्या बाया बोलू लागतात :**

महिलांची शिबीरं घेण्यात येऊ लागलीत. तळोदे तालुक्यात खरवड गावी झालेल्या शिबीरात आजवर इतरांच्या पुढयात न बोलणाऱ्या बायांनी बोलायला सुरुवात केली. प्रत्येकीचं नाव गाव विचारण्यात आलं. असही विचारण्यात आलं तुमच्या गावी दारू पडते का ? या शिबीरात प्रश्न आला की एखादी बाई दुसऱ्याच्या घरात दारू फोडते; पण तिच्या घरात ही जबाबदारी कुणाची ? यात भोरज गावची एक बाई पुढं आली. ती म्हणाली ' माझ्या घरी मीच सुरुवात करेन. अन् आज तिच्या घरी दारू गाळल्या जात नाही. प्यायल्या जात नाही अन् विकल्या जात नाही. अंबरसिंह महाराजांनी दारू बंद केलेल्या लोकांना कर्जे व बैल जोडी मिळवून दिली आणि त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय केली तेव्हाच दारूचे प्रमाण कमी झाले.

तसेच हा आर्थिक कार्यक्रम दारूबंदीला जोडण्या व्यतिरिक्त दारूसाठी लागणारा कच्चा मालच फोडण्याचा कार्यक्रम हाती घेतला. तो असा की ज्या भागात दारू गाळतात तिथे जायचं-तिथे आपणच वेचलेला मह सावकाराकडून आला की तोच ट्रक अडवायचा. परदेशी दारूसाठी भाड्याने जे पिंप द्यायचा तेच फोडून टाकायचं !

याशिवाय छायाताईंनी दारू प्यायलेल्या पुरुषावर गावकरी स्त्रियांकडून सामाजिक दबाव आणल्या जाण्याचे एक उदाहरण दिले. त्या म्हणाल्या आम्ही, नवरा दारू प्यायला की त्याचा भांग तोडून त्यात गुलाल भरायचा व गाढवावरून धिंड काढायची हीच प्रथा सुरू केली. तो गयावया करू लागला की त्याला बाईच्या पाया पडायला लावून माफी मागायला सांगायचं. दारूबंदीसाठी असे विविध उपाय योजनांना. पाडळदयाची दोन मुलं महाराजांकडे कामाला आलीत. त्यांना महाराजांनी म्हटले; विचार करून पहा, येऊन रहायच का ? मुलं तयार झालीत.

तर १९७३/७४ पर्यंत काम भरभराटीला आलं. पुण्यामुंबईकडून खूप मदत मिळाली. हुरूप आला. काम पुढे न्यावं असं वाटत होतं. जमिनीचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडवले जात होते. पण १९७४ मध्ये महाराजांचे निधन झाले. पण यानंतर छायाताई संघटनेचं काम करत राहिल्याच. लोकांनी मात्र दाबलं पण–गोविंदराव शिंद्याच्या आवाहनावरून पुन्हा जोरानं काम सुरू केलं-ते खंड न पाडता !

**दारू ! दारू !! दारू !!!**

छायाताईंनी कामाविषयीचे निवेदन व दारूबंदीचा कार्यक्रम याची माहिती दिल्यावर शिबिरार्थींनी दारूबंदी व दारूच्या व्यसनाच्या वेगवेगळ्या बाजू तपासून त्या स्त्रियांना कशा परावलंबी करत आहेत याची मीमांसा केली.

श्रीमती अनुताई लिमये म्हणाल्या, दारू फोडायचं काम अत्यंत अवघड आहे कारण दारू ही आर्थिक उत्पन्न देते एवढेच नव्हे तर ती धार्मिक व सांस्कृतिकरित्या लोकजीवनाशी निगडीत झालेली आहे. सर्व विधींना दारू लागते. याकरता आम्ही एक उपाय असा केला की, मुलगी पहायचा कार्यक्रम असला की बाहेरगावची पंचमंडळी जमतात. तिथे दारू वाटल्या जाते पण आम्ही जुनं पंचमंडळच बदलून नव्या पंचमंडळात चहाची पद्धत सुरू केली

शोभना गुप्ते यांनी घोलवड या ठाणे जिल्ह्यातल्या गावी श्री. पांडुरंगशास्त्री यांनी धार्मिक हेतूतून लोकांना कशी दारू सोडायला लावली व त्यातून स्त्री–पुरुष समानतेचा कसा प्रयोग केला ते सांगितले. श्री. पांडुरंगशास्त्री यांनी गुरुवारी भजन करून लोकांना गोळा करायला सुरवात केली. तिथे अनेक लोकांनी मारझोड व दारू सोडली. त्यांनी स्त्री–पुरुषांचे शिबीर घेऊन पुरुषांना स्वयंपाक करून स्त्रियांना मान दिला. तसेच

**ग्रामीण महिलांची आजची स्थिती**

१. सरंजामशाहीचे अवशेष नवी सरंजामशाही
२ देशमुख, पाटील, सधन शेतकऱ्यांच्या बायकांचा वर्ग.
३. श्रमजिवी स्त्रिया ! किशोरपण हरवलेल्या मुली.

– प्यारेलाल गोहेल

दारू पिऊन एखादा नवरा बाईला मारझोड करत असेल तर दहा बायांनी त्याच्या झोपडीवर जाऊन त्याला हाकलून द्यायचं व म्हणायचं की हे घर बाईचं अन् मुलाचं आहे. तुझा माज उतरला की तू परत ये. तसेच देवी चळवळीत दारूचे अड्डे बंद करायचे व दारू विकणाऱ्या पारशाच्या शेतावर कामाला जायचे नाही. ठाणे जिल्ह्यातून धार्मिक हेतूने दारू कशी सोडल्या गेली याचे दुसरे उदाहरण दिले.

**कार्यकर्त्यांनीच दारू प्यायची नाही :**

सुरेखा दळवी यांनी दारूबंदीचा प्रश्न स्त्रियांना संघटित करायला फार प्रभावी आहे. हे खरं पण संघटनेतंर्गतच त्यांनी दारूविषयी काय भूमिका घेतली, याविषयी माहिती दिली. त्या म्हणाल्या गावातली दारू तोडायच्या अगोदर आम्हाला कार्यकर्त्यांनी दारू प्यायची नाही, असा नियम करावा लागला. एखाद्या कार्यकर्त्याने दारू पिऊन बायकोच्या अंगावर हात टाकला की त्याला खांबाला बांधून ठेवायचं ही शिक्षा दिली. कार्यकर्त्यांमध्येच जागृतीचा एवढा अभाव आहे की ते बाईच्या पाया पडायला तयार नसतात. कुत्रीच्या पाया पडू पण बाईच्या नाही, असं त्यांचं म्हणणं असतं. जेव्हा कार्यकर्ते व लोक दोन्हीमध्ये स्त्रीविषयक दृष्टि-कोन केवढा पारंपारिकच आहे हे त्यांनी स्पष्ट करून सांगितलं.

श्रीमती रंजना कान्हेरे म्हणाल्या की, दारूची पाळंमुळं फार खोलवर गेलेली आहेत व ती कुठंवर व कशी गेलेली आहेत हे समजून घेणं महत्त्वाचं आहे. दारू पिऊन बाईला मारहाण करणं हे वाईट आहे हे लोकमानसावर ठसवायला, त्यांना शिक्षा करायला हवी तसच प्रबोधनही हवं. शहरी भागात दारूला प्रतिष्ठा आहे व भ्रष्टाचाराच्या व्यापारात पण दारू याच माध्यमाला स्थान आहे. मोठे साखर कारखाने दारूचं उत्पादन करतात व मजुरी ऐवजीसुद्धा लोक दारू स्वीकारतात, पार सत्ताधारी वर्गातही दारूची मुळं आहेत. या दारूविषयीच्या मोठ्या बाबी सूक्ष्मपणे ध्यान्यात घेतल्या तरच प्रबोधनकारांना आपली सर्व शक्ती एकवटता येईल हे त्यांनी स्पष्ट केलं.

यानंतर सरतेशेवटी दारू सोडायला लावण्यासाठी धर्माचा वापर करणं कितपत योग्य आहे हा प्रश्न कुसुम यांनी उपस्थित केला. त्या म्हणाल्या. या बरोबरच अखेरीस आपण लोकांना कुठल्या संस्कृतीकडे नेतो आहे हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. त्यांना आपण केवळ शहरी अंधानुकरणाच्या जाळात जोडणार आहोत की त्यांना वाण्याबामणांची संस्कृती शिकवणार आहोत. दारूबरोबर लोक मासमच्छी सोडतात मग त्यांनी खावं काय ? तसेच एक वाईट सवय व तिचे परिणाम घालवायला अंधश्रद्धेचा वापर फार फसवा आहे असे त्यांनी प्रतीपादन केले. धार्मिक अंधश्रद्धा तर खेड्यात इतकी तीव्र आहे की त्यापाई स्त्रीयांचा जीवसुद्धा घेतला जातो, ही बाब त्यांनी डोळ्यासमोर आणली.

श्रमिक संघटनेच्या सुरवातीच्या जडणघडणीतला स्त्रियांचा भाग व नंतर दारूबंदीसाठी स्त्रियांचे संघटन, या संघटनेच्या दोन टप्प्यांचे छायाताईनी विवेचन केल्यावर दारूविषयक स्त्री–पुरुषांच्या जाणीव जागृतीचे असमानता नाकारणारे कार्यक्रम कुठले आहेत. या-विषयी शिबिरार्थींचे अनुभव कथन झाले व दारूबंदी करावयाच्या माध्यमांच्या योग्य योग्यतेविषयी मत प्रदर्शन झाले.

**ग्रामस्वराज्य समिती, विक्रमगड**

यानंतर श्रीमती शोभा मुळे, ग्रामस्वराज्य समिती विक्रमगड, जि. ठाणे यांनी आपल्या संस्थेत काम कर-ण्याचा अनुभव सांगितला. त्या गेल्या सात वर्षांपासून ठाणे जिल्ह्यात काम करीत आहे. मॅट्रिकच्या परिक्षेनंतर बघू या तरी शिबीर हा काय प्रकार असतो अशा कुतू-हलानं एकदा ग्रामस्वराज्य समितीच्या शिबिराला गेलेली शोभा मग पूर्णवेळ त्याचेच काम करू लागली. तिने प्रथम बेलपाडा या गावी काम करायला सुरुवात केली. गांव अगदी दारूडा होता. शोभा गावात गेली तेव्हा तिला चित्र दिसलं ते असं, गांव ओसाड-शिक्षक दारूच्या तंद्रीत, पोरसोरं उन्हातान्हात भटकणारी, बाया सगळ्या अंगठेबहाद्दर ! सुरवातीला गावात काम करू लाग-ल्यावर परिस्थिती बिकटच होती. तू एवढीशी पोर म्हणून बाया दाद देत नव्हत्या. रात्री घराच्या दारावर दगड येत होते. यातूनच धीर काढून मग हळूहळू बालवाडी सुरू केली. तसा मुलांमुळे आयांशी संपर्क येऊ लागला. हळूहळू दोनचार बाया हाताशी लागल्या तसा प्रौढ साक्षरता वर्ग पण सुरू झाला. गावात नवराबायको

दोन्ही दारू पिणारे. मग बाया पिऊनच शाळेला येत. एकदा एका बाईला नवऱ्याने मरेस्तोवर मारले. ती सुजलेल्या अंगाने शाळेत आली. पण असा मार कां खायचा हा कुणी प्रश्न विचारला नाही. शोभाच्या लक्षात येऊ लागलं होतं की प्रौढ शिक्षण वर्गात दारूविरुद्ध झोड धरायला हवी आहे. आपण दारू करायची नाही. प्यायची नाही. बाहेरून कुणी दारू पिऊन आला तर आला ज्याच्या घरी दारू गाळल्या जाते त्याला २५/– रु. दंड करायचा.

ग्रामस्वराज्य समितीची अशी धारणा आहे की लोकांनी आपले प्रश्न आपणच सोडवायचे. आपले संघटन त्याकरता आवश्यक आहे.

संघटन होण्यास एक घटना कारणीभूत ठरली. एका घराची भाडेपट्टी दिली नाही म्हणून ग्रामसेवकाने सरळ कोंबडी उचलून नेली. शोभाला याची कुणकुण लागली. तिन विचारलं. घरपट्टी भरली नाही तर घरातली वस्तू नेली असं कां? करता करता पंचवीस तीस मुली तयार झाल्यात. आपल्या सायकलवर बसून ग्रामसेवक दुसऱ्या गावाहून येत होता. मुलींनी त्याला अडवून कोंबडी मागितली. कोंबडी दे नाहीतर सायकल गहाण ठेव हा त्यांनी पवित्रा घेतला. एवढ्या मुलींना पाहून गडबडलेल्या ग्रामसेवकाने कोंबडीची किंमत भरली. ही एक घटना संघटना करण्यास कारणीभूत ठरली.

भांडणाची तक्रार करायला पोलीस स्टेशनवर गेलेल्या एका स्त्रीला पोलीसाने म्हटलं, "कोंबडी, दारू घेऊन तू माझ्या घरी ये म्हणजे मी भांडण मिटवतो." पोलीस स्टेशनवर स्त्रियांनी याचा निषेध करायचा मोर्चा नेला. तसंच दारू पिणारे शिक्षक गुर्मित असत व आम्ही सरकार दरबारी हप्ते भरतो, आमची बदली होणार नाही असं सांगत. तेव्हा गावकऱ्यांनी अशा शिक्षकांची बदली व्हावी म्हणून बीडीओला घेराव घातला. उपोषण केलं व बदली झाली. तेव्हा गावात जे कर्मचारी आहेत ते भ्रष्टाचार करू शकणार नाहीत एवढा गावकऱ्यांचा त्यांच्यावर अंकुश हवा हे म्हणणं लोकांना पटत गेलं. लोक संघर्षाला तयार होऊ लागले.

यानंतर पहिल्या सत्राचा समारोप करताना गं. बा. सरदार म्हणाले, आपल्याकडे धर्मश्रद्धेनुसार दारूला गौणत्व आहे. मात्र दारूला पाश्चिमात्य जगात प्रतिष्ठा आहे. सावकार कारखानदारांचा नवा वर्ग त्यांनाच सामील आहे. या दुहेरी पेचातून वाट काढून परंपरेत दारूला गौणत्व आहे. चातुर्मासात दारू वर्ज्य आहे. याचा आधी उपयोग करून घेऊन नंतर मग पूर्ण बौद्धिक निकषावर लोकांना दारू सोडायला लावली पाहिजे. केवळ दारूऐवजी माळ हाती देऊन दारू सोडवणं हे केलं व इथ पावेतोच ते सीमित राहिलं, तर लोकांना रॅशनल विचाराचं वावडंच राहील. जे लोक आपली भूक मारण्याकरता, तंटे विसरण्याकरता दारू पितात त्यांना दारूला खरा पर्याय आहे सुरक्षितता व स्वास्थ्य. हा पर्याय नसताना लोकांची दारू सुटणं कठीण आहे. तसेच स्वेच्छेने वरचा वर्ग दारू सोडत नाही तोवर ज्याना स्वास्थ्य नाही त्यांना दारू सोडा असं म्हणायचा हक्क कुठून उरतो हा प्रश्न येतो.

दारूचा प्रश्न संघटन करण्यासाठी प्रभावी आहे. मोलाचा आहे. पण तो सतत चालणारा नाही. महिलांना नवे प्रश्न नव्या जोखिमा घ्याव्या लागणार आहेत.

## सत्र दुसरे

दुसऱ्या सत्राच्या सुरवातीला गरीब डोंगरी संघटनेच्या श्रीमती कुसुम सोनवणे बोलल्या. संघटनेची आपल्याला जरूर कशी पडली व आपली त्याविषयक जाणीव कशी खोलावत गेली या संबंधी त्या बोलल्या. एका हरिजन बाईने सवर्ण गावात बालवाडी सुरू केली तर तिला कुठकुठ कोंडीत पकडायचे यत्न झाले व संघटनेच्या आधारावर व स्वतःच्या धीरावर ती यातून कसा मार्ग काढत गेली या विषयीचा जिवंत अनुभव त्यांनी सांगितला.

### महिला कार्यकर्त्यांचे काही प्रमुख प्रश्न

१. त्या त्या समाजातून कार्यकर्त्या तयार करणे.
२. कायम प्रशिक्षण.
३. संघटन-शक्तीचा पाठिंबा.
४. राजकीय इच्छाशक्ती.
५. जबाबदारी घेणारी संघटना हवी.

– प्यारेलाल गोहेल

**अंधश्रद्धा व जातीपातीचा सासुरवास :**

संघटना बांधण्याच्या कामातला आपला अनुभव सांगताना त्या म्हणाल्या की, ग्रामीण लोक अजून अंधश्रद्धा व जातीपातीच्या सासुरवासात आहेत. सर्व जातींची माणसे संघटनेत एकत्र यायला हवीत. पण जात, वर्ण सर्वात अधिक चिवट अडथळे आहेत. दुसरा अडसर लिंगभेदाचा आहे. बायापुरुषांना संघटना एका विषयावर मतप्रदर्शन करायला, निर्णय घ्यायला एकत्र आणण्याचे यत्न करते. मात्र पुरुषांना वाटतं की, बाया-पुरुष एकत्र येतात हे काहीतरी भोंदू नाटकच आहे.

**समाजवादी महिला सभेचे झोपडपट्टीतले काम :**

समाजवादी महिला सभा पुणे, यांच्या पुण्यातील झोपडपट्टीमधील कामाविषयी, आपल्या अनुभवाविषयी रजनी बर्डे बोलल्यात, येथील बाया अतिशय कष्टाळू आहेत व पुरुष सर्वच अनाधिकृत कामात गुंतलेले आहेत. त्यांचा दबाव फार मोठा आहे. ते स्त्रियांची संघटना उभी करायची बातच समजून घेत नाही. समाजवादी महिला सभा मोठमोठया दवाखान्यांची शिबिरे आपल्या झोपडपट्टयात राबवायचं काम करते. हिवाळयातून कपडेवाटप, कर्जवाटप योजना लोकांपर्यंत पोचवण्याकरता प्रयत्न, आरोग्यदक्षता, नळपाणी वाटप, वातावरणाची स्वच्छता, लोकांना स्वतःच्या हितासाठी असलेल्या सरकारी योजना समजावून देणे अशी त्यांची कामे आहेत. बहुतांशी कार्यकर्त्या मध्यमवर्गीय, शहरी आहेत. त्यांना घरातून मदत नाहीच. त्यांना आपल्या सांस्कृतिक पार्श्वभूमीमुळे पहिल्याप्रथम झोपडपट्टीत जाण्याचाच व कामाला लागायचा तणाव आला.

**लई श्यानी जाली :**

दलित कलामंच या संस्थेच्या शिल्पा मुंब्रीसकर पुणे शहरातील एका झोपडपट्टीत पथनाटय, गाणी यातून लोकशिक्षण करतात. पण या गटात स्त्रियांच्या निर्णयाला काहीच मोल नसल्याने त्यांनी बाहेर पडून आपली वेगळी संस्था स्थापली व आरोग्य, शिक्षण, अंधश्रद्धा, दारू, भगत यासारख्या अनेक विषयांवर लोकांच्याच शब्दात त्यांचे प्रश्न नाटयरूपाने सादर केलेत. त्या म्हणाल्या की, एखाद्या संस्थेत जेव्हा एखादी मुलगी तोंड मिटून बसते तेव्हा तिला काही कळत नाही असं म्हटल्या जातं व तीच बोलू लागली की 'लई श्यानी' म्हणतात. एकूण गप्प बसण्याचा सोयीस्कर फायदा घेतला जातो व बोलण्याचा समतोल अर्थ घेतला जात नाही.

**संघटनांतसुद्धा स्त्रियांचा वापरच होतो का ?**

या सर्व अनुभव कथनानंतर चर्चा झाली. त्यात सुरेखा दळवी म्हणाल्या कुठल्याही संघटनेत व पक्षात स्त्रियांचा वापरच जास्त करून होतो असे चित्र दिसून येते. मोर्चाची संख्या वाढावी म्हणून पक्षांतर्फे झोपड-पट्टयात काम होतं पण प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत तिचा सहभाग शून्य रहातो. बहुतकरून स्त्रियांचा विचार, त्यांचं बोलणं याकडे दुर्लक्ष केल्या जातं व ज्या बोचणाऱ्या गोष्टी एखादी बाई बोलून दाखवेल तीचं ढालगज भवानी म्हणून स्वागत होतं. शिबिरांमध्येही अनेकदा जेवणाखाण्याची जबाबदारी स्त्री कार्यकर्त्यांवर टाकून पुरुष कार्यकर्ते मोकळे होतात व बायांनी कामाची विभागणी करावी हा हट्ट धरला तर त्याचं हसं होतं. अनुताई लिमये म्हणाल्या 'घर ही संस्था महत्त्वाची आहे ही जाणीव स्त्री कार्यकर्त्यांनी जगाला द्यायची आहे. पण तिचा संदर्भ असा की घर जर महत्त्वाचं आहे तर स्त्रीपुरुष दोघांनीही त्याला वेळ दिला पाहिजे. पुरुषाच्या अधिकृत वा अनाधिकृत कामांसाठी, समाज कार्यासाठी स्त्रीने आपला संपूर्ण वेळ त्याग करणं हे अयोग्य आहे. घर व संसार स्त्री-पुरुष दोघांनीही करून कामासाठी कसा मार्ग काढायचा याबाबत कार्यकर्त्यांनी चर्चा करायला हवी.

छायाताई सुरतवंती म्हणाल्या ग्रामीण भागात बाहेरून आलेली व स्थानिक स्त्री कार्यकर्ती यांच्याकडे समाज वेगळ्या वेगळ्या तऱ्हेने पहातो. व तो त्यांना वेगवेगळ्या तऱ्हेने दबाव आणेल ही दुसरी वस्तुस्थिती आहे. तसेच कार्यकर्ता वर्गात स्त्री कार्यकर्तीचा कसा विचार होतो आणि स्त्रीकार्यकर्तीचा एकंदर समाजात कसा विचार होतो याच्या खोलात गेले पाहिजे. यावर श्री. शरद कुलकर्णी म्हणाले की अनेक संघटनांमध्ये आजही निर्णयप्रक्रिया पूर्णतः पुरुषी आहे. हे खरे आहे. स्त्रियांना मार खावा लागतोय हे सत्य आहे. पण मार निमूटपणे वेगवेगळ्या संदर्भात खात रहाणार? की मार खातानाच आपापसातच सहकार्य कसं वाढेल याचा स्त्रीला गंभीरपणे विचार करणार ही मेख आहे.

याकरिता एकतर स्त्रीविषयक दासी व देवी हे दोन्ही दृष्टिकोन त्याज्य केले पाहिजेत याकरिता स्त्रीविषयक कार्यक्रमांचा दृष्टीकोन कसा असावा, तो कसा वाढावा व कसा बदलावा याच्याविषयी पुन्हा नव्याने विचार करण्याची जरुरी आहे मात्र या सर्व उद्दिष्टांकरिता स्त्रियांनी आपापल्या अनुभवांची परखड नोंद करणे आवश्यक आहे. नाहीतर हा सारा अनुभवांचा दडपलेला व नाकारला जाणारा प्रवाह जिरून जाण्याची शक्यता आहे.

## स्त्रियांनी कुठले कुठले कार्यक्रम घ्यावे ? :

दुसऱ्या सत्राच्या दुपारच्या बैठकीत महिला कार्यकर्त्यांनी कुठकुठले कार्यक्रम घ्यायला हवेत यावर चर्चा झाली. या सत्रात रंजना कान्हेरे यांनी स्त्रीश्रमिक संघटनेची माहिती दिली व त्यांनी स्त्रीशिक्षणासाठी राबविलेला विज्ञानजत्रेचा कार्यक्रम सांगितला त्या म्हणाल्या, स्त्रिया लैंगिक शिक्षणापासून वंचित ठेवल्या जातात व पुरुष विकृत मार्गाने हे ज्ञान मिळवतात. या विकृत मार्गामुळे, पुरुषांचा, स्त्रियांकडे पहाण्याच्या दृष्टिकोनातही विकृती येतात. दुसरी गोष्ट निष्पाप, निरागसता, लाज या आवरणाखाली, स्त्रियांना पाळी कशी येते, मूल कसं होतं या गोष्टी कधी नीट समजावून सांगितल्याच जात नाहीत. मात्र या अज्ञानाबरोबर तुझे शरीर हेच तुझे सर्वस्व, हे मूल्य मात्र जीवाच्या आटापिटयाने स्त्रीवर ठसविले जाते.

परिणामत: स्त्रीच्या मनात पद्धतशीरपणे एक न्यूनगंड व अपराधीपणाची भावना ठसविली जाते. याचा कुटुंब नियोजनासारख्या स्त्रीला अतिशय फलकारी असणाऱ्या कार्यक्रमांवर अतिशय वाईट परिणाम होतो. स्त्रियांच्या गटांनी कुटुंबनियोजनाचा प्रचार व साधनांची माहिती, स्त्रियांचे आपल्या शरीरावर स्वामित्व आहे या भूमिकेतून केला पाहिजे. शोभना गुप्ते म्हणाल्यात की स्त्रीत्वाच्या जाणिवेवर देखील धर्मकल्पनेत मोठा पगडा आहे. मल न होऊ देणे हे धर्मविरोधी समजल्या जाते. कुसुम म्हणाल्या की कुटुंबनियोजनाची उपयोगिता समजून देणे याबरोबरच लूप, गोळया अशा कुटुंबनियोजनाच्या विविध साधनांपासून जे गैरपरिणाम होतात त्याबाबत स्त्रियांनी बोलके झाले पाहिजे. अनेक पुढारलेले देश तिसऱ्या जगात घातूक तंत्रज्ञान औषधे वापरून पहातात हे सर्वश्रुत आहे स्त्रीसंघटनानी याच्याविरूद्ध कारवाई केली पाहिजे. चंपा कुलकर्णी म्हणाल्या आपली समस्या दुहेरी आहे. एक जरूर तिथे आधुनिक तंत्रज्ञान पोचवणे' व दुसरी आधुनिक आरोग्य व्यवस्थेचे गैरफायदे' उघडकीस आणणे.

चंपा कुलकर्णी यांनी लैंगिक व आरोग्यशिक्षण शास्त्रीय दृष्टिकोन या संबंधाने लोकशिक्षण करण्यासाठी स्त्री संघटनांनी प्रथम भरभक्कम आर्थिक पायावर उभे रहाणे जरूर आहे व त्याकरिता स्त्रीसंघटनांनी आर्थिक कार्यक्रम घ्यावे असं सुचविलं. त्या म्हणाल्या कुठच्याही खेडयात व गावातून बाहेर जाणाऱ्या कच्च्या मालावर तिथेच प्रक्रीया करून तो पाठवावा अशा योजना स्त्रियांना घेता येतील. कुसुम म्हणाल्या की स्त्रियांनी अशाच प्रकारचे आर्थिक कार्यक्रम हाती घेतले पाहीजेत की जे त्यांचं समाजातील स्थान बदलू शकतात, त्यांच्या निर्णयशक्तीला वाव देऊ शकतात. या निकषावर घासून मगच आर्थिक कार्यक्रम घ्यावे.

## कायदा गाढव नाही :

सुरेखा दळवी यांनी कायदेविषयक प्रशिक्षणाचे गांभीर्य नोंदले. त्या म्हणाल्या, 'पारंपारिक योनि शुचितेच्या व धार्मिक कल्पना आणि सामाजिक रूढी यामुळे खेडयातील स्त्री अज्ञानात आणि चौकटीत अधिकच बंदिस्त होऊन रहाते. याबाबत काही मुस्लीम स्त्रियाचं उदाहरण देऊन त्या म्हणाल्या, 'अनेक मुस्लीम स्त्रियांना पोटगी मिळते हे ठाऊकच नव्हतं ' पारंपारिक कुटुंबव्यवस्था शहरी व ग्रामीण दोन्ही स्त्रीयांचे शोषण करत असते. मध्यमवर्गीच खाजगीपणाच्या मुल्यामुळे स्त्रिया मूक राहतात. त्यांनाही बोलते करून त्यांच्या वरच्या अन्यायाला दाद मागायला शिकवण्याची जरुरी आहे. तसेच पुढारलेल्या वर्गात स्त्रियांमध्ये तर गुलामी जास्त आहे. या सर्वच स्त्रियांचा बलात्कारित स्त्रीकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलायची जरुर आहे. म्हणजे बलात्कारित स्त्रीला केवळ अपराधी न वाटता कायद्याकडे दाद मागायचे धैर्य येईल, ग्रामीण भागात स्त्रियांना कायद्याची माहिती झाली तर पोलीसी अत्याचाराला आळा बसेल. कायद्याची माहिती स्त्रियांवरील अत्याचाराला ( घरातल्या किंवा घराबाहेरच्या ) आळा घालायला उपयोगी एवढेच नाही.

कायदा स्त्रियांचे आर्थिक स्थानही बदलायला मदत करू शकतो. युसूफ मेहेरअली सेंटरमध्यल्या कामाचा एक बोलका अनुभव त्यांनी याबाबत सांगितला. मजुरी समान करायला तिथे स्त्रियांचाच विरोध होता. कारण-अज्ञान तथापि स्त्रीयांमध्ये जागृती झाली तर त्या कोणते पाऊल उचलू शकतात याची चुणूक त्यांनी दुसऱ्या उदाहरणात दिली.

### स्त्रियांकरिता लोकन्यायालय हवे :

त्या म्हणाल्या, एका गावात पारंपारिक पद्धतीने न्याय दिला जात होता तेथे त्या गावकीलाच स्त्रियांनी विरोध केला व म्हटले, ग्रामपंचायतीत बाई नाही तर पंचायत स्त्रियांचे प्रश्न कसे सोडवणार ? तुम्ही पंचायतीत स्त्री प्रतिनिधी घ्या नाहीतर आम्ही पंचायत चालू देणार नाही.

आपल्या बाजूने झालेले कायदे ठाऊक झाले, आपल्या हक्काचं ते रक्षण करतात असं दिसलं की परंपरागत सोशिक असलेल्या स्त्रीला सुद्धा नवऱ्याला तुरुंगात बसवण्याइतकी तिडीक येऊ शकते. नवराबायकोच्या भांडणात पडू नये असा सामाजिक संकेत आहे. असे जुने सामाजिक संकेत मोडणे, पुरोगामी कायदे करणे, असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी यत्न करणे, स्त्रियांना कायद्यांची माहिती देणे, नव्या कायद्यांचा परिणाम जोखणे, अशा कितीतरी पातळ्यावर स्त्रियांना कायदेशिक्षणविषयक काम करणे शक्य आहे.

लोकन्यायालय स्त्रियांकरताच हवे ही मागणी आपण करू शकलो पाहिजे. कौटुंबिक कायदे, वेठबिगार, कुळकायदा, संरक्षण, नागरी हक्क इत्यादीवर स्त्रियांची शिबिरे घ्यायला हवीत.

### तवा तापवून त्यावर मला उभं केलं :

यानंतर अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्यक्रम स्त्रियांनी घेणे जरुर आहे असा ठराव पडला. अंधश्रद्धेमुळे स्त्रियांचा भूताळी म्हणून जीव घेतल्या जातो, याचे शोभा मुळेने उदाहरण दिले. ठाणे जिल्हयात तीन कातकरी बायांना भूताळी म्हणून तवा तापवून पाटील समाजाने त्यावर उभं केलं.

शरद कुलकर्णी म्हणाले, भूताखेतांवर विश्वास हे आदिवासी समाजाचे वैशिष्ट्यच होऊन बसले आहे. चांगले कार्यकर्तेसुद्धा याला अपवाद नसतात. याकरता कारण लोकांना संघटित करताना अंधश्रद्धा निर्मूलन-विषयक व आरोग्य शिक्षण दिले नाही तर चळवळ मर्यादित होईल.

अनुताईंनी सूचना केली की याकरता विज्ञान-जत्रेसारखे कार्यक्रम महाग पडले तरी केले पाहिजेत. विज्ञानजत्रेतून स्थानिक लोकांत, मुलांत वैज्ञानिक दृष्टिकोन येऊ शकतो व ते स्थानिक पातळीवर वेगवेगळे कार्यक्रम हाती घेऊ शकतील असे शुभदा देशमुख म्हणाल्या. श्रीमती लिला चितळे म्हणाल्या विदर्भात अशा प्रकारच्या कार्यक्रमांची फार जरूर आहे.

शहरांमुळे खेड्यात अंधश्रद्धा पसरते. सार्वजनिक गणेशोत्सवाचे खेड्यात अंधानुकरण होते व लोक नवसाला तिथे रांगा लावतात, असे कुसुम म्हणाल्या. याला कसा आळा घालणार हा त्यांचा प्रश्न होता.



### सत्र तिसरे

या सत्राच्या अध्यक्षपदी सुरेखा दळवी होत्या. या सत्राचे प्रास्ताविक शरद कुलकर्णी यांनी केले. लिला चितळे यांनी म्हटले की, संस्था, संघटनांनी कोणकोणते कार्यक्रम घ्यावे याविषयी आपली चर्चा झाली आहे. पण संस्थांतर्गत स्त्रियांच्या प्रश्नाबाबत आपण कोणती भूमिका घेत असतो, घेत रहातो ह्या बाबतीत सजग असणे तेवढेच जरूरीचे आहे याबाबत शरद कुलकर्णी म्हणाले, अनेक वेळा संस्थांचे अनेक नियम असतात व त्यांना नियमाबाहेर जाता येत नसते. मग प्रश्नाची नड असेल तर अशा वेळी कार्यकर्त्यांनी वैयक्तिक भूमिका घेण्याची जरूर असते. प्रश्न अर्धवट सोडण्यापेक्षा संस्थेच्या चौकटीबाहेर-कुमारी मातृत्व, बलात्कार, पोटगी, गर्भपात यासारख्या विषयावर संघटन, प्रबोधन करण्याची जरुरी आहे, हे सुरेखा दळवी यांनी नमूद केले. याबाबत आपण आपली भूमिका कशी ठरवतो ? अनुताई लिमये म्हणाल्या आपली भूमिका ठरवताना संघटना कुठचे निकष वापरणार आहे व स्वत:वर कुठची बंधनं घालून घ्यायला तयार आहे हे महत्त्वाचं आहे. कारण अनेक संघटनाच्या कार्यकर्त्यांची विवाह संस्था मानायची नाही ही भूमिका आहे, पण तरीदेखील कार्यकर्त्यांनी संयमित जीवन जगावे ही एक अपेक्षा आहे. अन्यथा समाज भोगवादाकडे झुकू शकतो.

यानंतर स्त्री कार्यकर्त्यांची जी रहाणीसहाणी असते त्यातून त्यांच्याविषयी समाजात काय प्रतिमा तयार होते व त्याचा कामावर काय परिणाम होतो असे प्रश्न उभे राहिले. असे दिसते की ग्रामीण भागात कुंकू, मंगळसुत्र नसलेली कार्यकर्ती विधवा, नवऱ्याने टाकलेली आवारा समजल्या जाते. यावरुन आटोकाट वाद होतात. यावर समजदारीची भूमिका घ्यावी असे अनुताई लिमये यांचे मत. तर अनेक कार्यकर्त्यांना वाटते की, यावर समजदारीची भूमिका घेणे म्हणजे तडजोड होईल.

यानंतर सुरेखा दळवी म्हणाल्या की, घर, संसार सांभाळून वा बोलून अनेक कार्यकर्त्यांचे जीवन उभे राहिले आहे. गेल्या पिढीच्या स्त्रियांचा लढा, भूमिका आजपेक्षा वेगळी आहे. याचा त्यांनी काय भोगलं, कशाप्रकारे त्यांच्यावर बंधन होती याची पार्श्वभूमी आहे.

### जुन्या पिढीने अनुभव सांगावे :

याकरता आधीच्या पिढीतल्या स्त्रियांनी अनुभव कथन करणं जरूर आहे. रहाणीसहाणीच्याबाबतीत सुद्धा प्रत्येकाचे अनुभव सारखे नसतील. प्रश्न मांडायची पद्धतहीसारखी नसेल. हा आवाका समजून घ्यायचा अनुभवकथनाची जरूर आहे. या अनुभवकथनातून आपली स्त्री कार्यकर्ती म्हणून आपली भूमिका तपासता येईल. आपली भूमिका काय असावी याकरता कुठचे निकष आपण लावू ?

लिला चितळे : आपण काम करायला लागलो तेव्हाचे अनुभव सांगून म्हणाल्या स्त्रीला आज ती जिथे आहे तिथे राहून हळूहळू स्वत:चे निर्णय घेण्याची क्षमता व निर्णय घेतल्यावर त्या मागची जबाबदारी पेलण्याचा निश्चय हवा ही आपल्या अनुभवाचं विश्लेषण करण्यामागची भूमिका हवी.

### स्त्री–पुरुष दोघांनाही समतोल साधायचा आहे :

कुसुम याबाबत म्हणाल्या की स्त्री व पुरुष यांना दोघांनाही जगायचा समतोल साधायचा आहे. स्त्री व पुरुष दोघांवरही संस्कार समाज परंपरामुळे होतात. पुरुषाने बाहेर अठरा तास काम करणे व स्त्रीने घरात राबणे योग्यच आहे असे भासवणारे पर्याय या परंपरा आपल्यापुढे उभे करतात. तथापि यातून स्त्री–पुरुष दोघांचेही होणारे अमानवीकरण टाळता येतील का हा आपले अनुभव निरखण्यामागे एक निकष हवा. माणूस म्हणून निर्णयप्रक्रियेत आपल्याला समान हक्क हवे. याकरता आपला झगडा आहे हे सांगून सुरेखा दळवी म्हणाल्या याकरताच नव्या जुन्या पिढीत अनुभवाचा दुवा असणं जरूरीचं आहे.


या दरम्यान काही कार्यकर्त्यांनी आपले, आपल्या निर्णयप्रक्रियेचे, स्त्री म्हणून आपण सामाजिक संदर्भांना कसे सामोरे गेलो याबाबतचे हेलावून टाकणारे वैयक्तिक अनुभव उघडे केले.

संघटनांतरर्गत प्रश्नांवर कार्यकर्त्यांनी निश्चित भूमिका घ्यावी, तिचे निकष काय असावे, भूमिकेचे व अनुभवाचे विश्लेषण करण्यामागे कुठची जाणीव व दुवा असावा याची चर्चा झाल्यानंतर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने यापुढे कोणती शिबिरे घ्यावी याबाबत कार्यकर्त्यांनी सूचना केल्या.

याप्रमाणे परिषदेने लोकशिक्षणासाठी कोणकोणत्या माध्यमाचा वापर होऊ शकतो व यातून नुसती माहिती देणेच नाही तर स्त्रीची प्रतिमा व अर्थ कसे बदलता येतील यासंबंधाने एक शिबीर व कायदेविषयक एक शिबीर घेण्याचे ठरविले आहे असे प्रा. मुटाटकर यांनी आभार मानताना सांगितले. ते म्हणाले, "नव्या विचारांचा समाजावर फार हळूहळू परिणाम होतो. हे विचारमंथन कधी सुरू करावे, कधी त्याला वेग द्यावा ही परिषदेची भूमिका आहे. यासाठी समाजाच्या सर्व थरातून, वर्गातून अनुभव व्यक्त व्हायला हवेत. या अनुभव कथनातूनच वैचारिक स्पष्टता येणे शक्य आहे. याकरिता स्त्रीला, शहरी, ग्रामीण, आदिवासी, या सर्वांनी बोलणं, लिहिणे, आपले अनुभव दुसऱ्यापर्यंत पोचवणं अतिशय जरूरीचं आहे. त्यांचा आवाज दूर जावा, कोंडूनच राहू नये, यासाठी हाकारा हे माध्यम उत्सुक आहे. ते म्हणाले, समाजात जुने प्रश्न आहेत त्यात नव्याची भर पडत जाते व सर्वांची उकल व्हावी लागते याकरिता सर्वांनी यथाशक्ती वाटा उचलावा लागतो या भूमिकेतून परिषदेने हे चर्चासत्र आयोजित केले.

चर्चासत्राच्या अध्यक्षा सुरेखा दळवी म्हणाल्या की हे सत्र बरंच यशस्वी झालं असं मी मानते. कारण यातून संघटनांना उपयुक्त अशा अनुभवांची देवाणघेवाण झाली. आपण हे भान ठेवायला हवंय की चर्चासत्राचा रोख फक्त स्त्रियांवर नव्हता, तर समाजात स्त्रियांचे स्थान, त्यामागचे स्त्रीपुरुष संबंध, पारंपारिक संबंध अधिकच घट्ट करणाऱ्या काही रूढी, सवयी, परंपरा, संघटनांतर्गत स्त्रियांविषयीची समज व जाणीव, यावर होता. या सत्रात आधीच्या पिढीच्या कार्यकर्त्यांच्या खंती, मर्यादा, कार्य व अपेक्षा चर्चिल्या गेल्या. यातून जुन्या नव्याचा दुवा जोडला जावा व कार्यकर्त्यांनी समान निर्णय-प्रक्रियेची जबाबदारी घ्यावी असे म्हणून त्यांनी समारोप केला.

○○○



श्री. बाबा आमटे

# हार्दिक अभिनंदन !

प्रख्यात समाजसेवक श्री. बाबा आमटे यांना त्यांच्या समाजसेवेच्या गौरवार्थ या वर्षीचा मॅगसेसे पुरस्कार देण्यात आला आहे. त्याबद्दल 'हाकारा' तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

तसेच ज्येष्ठ समाजसेविका अनुताई वाघ यांना जमनालाल बजाज पुरस्कार देण्यात आला आहे त्याबद्दल त्यांचेही हार्दिक अभिनंदन ! अनुताई वाघ यांचा अमृतमहोत्सव नुकताच साजरा करण्यात आला, त्यांना हार्दिक शुभेच्छा !

जीवेत् शरदः शतम् !

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

# महिला कार्यकर्त्यांचे चर्चासत्र – १२ ते १५ मार्च १९८५

सहभाग

१) लीला चितळे
डॉ. राममोहन लोहिया उन्नती मंडळ,
६, एम. व्ही. एच. बी. कॉलनी, जी. पी. ओ. मागे,
सिव्हिल लाइन्स, नागपूर.

२) शोभना गुप्ते
घोलवड स्त्री शक्ती जागृती, मिस्त्री निवास,
मु. पो. घोलवड, ता. कोसबाड, जिल्हा ठाणे,

३) शुभदा देशमुख
जागृत आदिवासी संघटना द्वारा डॉ. सतीश गोगूलवार मु. पो. कुरखेडा, जिल्हा गडचिरोली.

४) अनुसया लिमये
आदिवासी सहज शिक्षण परिवार, (मासवण)
१५७७ सदाशिव पेठ, पुणे – ४११ ०३०.

५) रंजना कान्हेरे
श्रमिक संघटना, मोहिदे रोड, शहादा,
जिल्हा धुळे.

६) रजनी बर्डे
७) चंपा कुलकर्णी
८) माई केदारी
} समाजवादी महिला सभा
२५० क, नवा शनिवार पेठ,
पुणे – ४११ ०३०.

९) जिजा कमळ रेरे
१०) अनुबाई कटके
} जागृत भाऊबंदी संघटना,
मु. मार्गाची वाडी,
पो. पाथरज, ता. कर्जत,
जिल्हा रायगड.

११) सुरेखा दळवी
श्रमिक क्रांती संघटना
मु. तारा, पो. बारापाडा, ता. पनवेल,
जिल्हा रायगड ४१० २०६.

१२) शिल्पा मुंब्रीस्कर
दलित कला मंच, होप,
३०७ मंगळवार पेठ,
भीमनगर,
पुणे – ४११ ०११.
१३) मेघा वसंत पवार
} दलित कला मंच.

१४) नुतन शिरसाट
'मौक्तिक' घर क्र. २१९
प्लॉट १६,
स. क. १२/२ सांगवी,
पुणे ४११ ०२७.
१५) श्रीमती लीला दरेकर
१५१ कसबा पेठ,
पुणे – ४११ ०११.
} 'जाणीव' संघटना
पुणे.

१६) हिमाताई खंडू पडळघरे
मु. पडळघरवाडी पो. रिहे.
१७) कुसुम सोनवणे,
नांदगाव, जिल्हा पुणे.
१८) कोंडाबाई ढेबे,
आडमाळ, जिल्हा पुणे.
१९) सरुबाई मारुती कडू
मु. वडवली, पो. तव
ता. मुळशी, जिल्हा पुणे.
} ता. मुळशी
जिल्हा पुणे, गरीब डोंगरी संघटना
'स्त्री शक्ती मंडळ'
द्वारा हेमा राइरकर,
राइरकर बंगला,
आमराई, गोखले अर्थशास्त्र संस्थे-जवळ, पुणे.

२०) कुसुम कर्णिक
२१) शैला बेळे
} मु. पो. नारोडी, ता. आंबेगाव,
जि. पुणे.

२२) सुरेश लडकू भोईर,
'भूमिसेना'
पो. भोपोली, ता. पालघर,
जिल्हा ठाणे.

२३) श्री. सुधीर जोग
केळकर वस्तुसंग्रहालय,
शुक्रवार पेठ, पुणे.

०००

# मी कुसुम सोनवणे–

मी कुसुम सोनवणे, स्त्री शक्ती मंडळ–गरीब डोंगरी संघटनेत काम करते. आमची संघटना डोंगरातील सर्व गरीबांची संघटना. आमी बायांना एकत्र जमवतो. त्यांचे प्रश्न समजावतो. आन् त्यांची संघटना बांधतो. पहिल्यांदा बालवाडी घेऊन गावात कामाला सुरुवात केली. काहीतरी धंदा करतेय, पैसे मिळणार आहेत म्हणून घरच्यांनी काम करायला परवानगी दिली.

पण बालवाडी कुठे बसवायची ? गावात जिल्हा परिषदेची येकच शाळा......

अखेर भैरवनाथाच्या देवळात बालवाडी बसली. ४०–५० मुलं बालवाडीत यायला लागली. आपल्या पोराशी बोलावं तशी सर्व्या पोरांशी बोलू लागले. त्यांना शिकवू लागले पण......

माझ्यासारखी एक हरिजन बाई देवळात बसून शिकवते हे बगितलं अन् गावकऱ्यांना नुसतं मळमळू लागलं.

मग मला बाहेर काढायची खलबतं पण चालू झाली. पर ह्या बाईच्या हाताला धरायचं कुणी ? बोलायचं कोणी ? पर एकान हो विडा उचलला.

एक दिवस देवळाजवळच्या आपल्या शेतात औत धरलेला हा माणूस औत सोडून, चाबूक–दगड घेऊन देवळात आला. देवळात बसायचा अधिकार तुला कुणी दिला म्हणून मला विचारू लागला. मी म्हटलं मला सगळ्या पालकांकडून परवानगी आहे. आन् मग तू आहे त्या पद्धतीनेच मी माणूस असताना मला परवानगीची गरज काय म्हणूनही मी त्याला विचारलं.

आमची बाचाबाची झाली.

मी म्हणले जात–पात मला काय माहीत नाय.

देवाला एक माणूस हवा आन् एक नको, असं कुणी निवडलं ? तुमचं रक्त लाल मग माझं रक्त येगळं हाय का ? तुम्ही पुरावा द्या–तर मी जात मानीन, मी त्याला समजावू लागले.

तो कुठचा ऐकून घेतुया; पण तू आताच्या आता बाहेर हो. हितं बसायचं नाही म्हणून शिवीगाळ करत तो आरडतच राहिला. तेवढ्यात आसपासचे लोक गोळा झाले. त्यात बाया बापड्याही कुजबूजू लागल्या. आग शमली नाही. पण त्याचं तेवढ्यावर कुठं भागलं.

त्यानं मी बसत असलेली खूर्ची उचलली आणि बाहेर फेकून दिली.

मला अगदी संकट कोसळलं ! मला काहीच सुचेनासं झालं.

मी घरी येऊन रडत बसले. हा काय अन्याय ? ह्या जाती कोणी निर्माण केल्या ? एक ना अनेक प्रश्न.

पण मी विचार केला. असं रडून उपेग नाही. मग तशीच मी उठले अन् पौडला कार्यकर्त्यांकडे आल्ये. तेथे त्यांना माझी हकिगत सांगितली.

सर्वांनी मला धीर दिला. आज तुझ्यावर झालेला अन्याय तुझ्या एकटीवर झालेला नाही तो सर्वांवरील अन्याय आहे असं ते मला पटवून देऊ लागले.

मग आम्ही पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवली. फौजदारानी धीर दिला पण कुठं काय हालचाल दिसेना. गावकऱ्यांनी पैसे भरून फौजदाराला गप केलं का काय ? आख्या गावापुढं एकटी बाई काय काय करू शकल म्हणून गावकऱ्यातबी कुजबूज. कुठं काय धागा हालत नवता मग आम्ही डी. एस् पींकडे अर्ज केला. तिथे सुद्धा तो कुणाच्या कानावर जाईना. काही

हालचाल नाही. मग सर्व बाया एकत्र आल्या अन् पुण्यात डी. एस्. पींची भेट घेतली. तशी थोडीफार हालचाल झाली.

पोलीस स्टेशनला फर्मान आले. पोलीस गावात येऊन चौकशी करू लागले आणि गाव अगदी सामसूम ......थंड...बालवाडी आता बंदच ! सर्व कसं छान चाललेलं ? होळीची आग जणू विझून गेली.

आणि मग एका दिवशी अचानक ४०-५० माणसं माझ्यासमोर. काय प्रकार आहे मला समजेना. त्यातले काहीजण पुढं होऊन आपल्याला एकत्र यायचंय, चांगले संबंध ठेवायचेत असं म्हणू लागली. पोलिसांकडे नेलेलं प्रकरण मिटवावं एवढ्याचपुरतं त्याचा आग्रह. तेथेच एक बौद्ध पुढाऱ्याच्या मध्यस्थीनं ५०० रु. चोळी-पातळ देतो असही सुचविलं. मी सुन्न. तुम्ही असा का दबाव आणता ? पाचशे रुपये घेऊन मी काय करणार ? मला देवळातून हुसकावून लावलं...माझा अपमान केला ह्याची ही अशी भरपाई करता होय म्हणून मी त्यांना विचारलं. काहीही झालं तरी मी संघटनेशिवाय एकटी निर्णय घेणार नाही असही त्यांना सुनावलं. आमचं ऐकत नाही म्हणून पुढारी कावले. माझ्या ह्या वागण्यानं सरपंच, पोलीस पाटील वैतागले. त्यांना हा त्यांचा कमीपणा वाटला. पंचायत समितीच्या सभापतीपर्यंत हे प्रकरण पोचलं तर त्यांनी ह्या पुढाऱ्यांना एक बाई ऐकत नाही मग तुम्ही कसले पुढारी म्हणून हिणवलं.

माझ्या नवऱ्यालाही दमदाटी सुरू झाली. बायको ऐकत नाही हे कसं खपवून घेतो म्हणून त्याला डिवचू लागली. तू भाडखाव, तू कसला संसार करणार म्हणून त्यांना टोचू लागली.

गावातल्या गुंडांनीही माझ्यावर दबाव आणायला सुरुवात केली.

एकदा पोलीस स्टेशनला गेल्यावर तर दबाव आणावयाचा प्रयत्न करावा म्हणून सभापतींनीही भेटण्यासाठी निरोप पाठवला. पण काय आश्चर्य फौजदाराचा रंग एकदम पालटला. त्यांनी मी येणार नाही असा सभापतीकडे फिरून निरोप पाठवला. गुंडांनाही तंबी दिली. माझ्या नवऱ्यालाही तुमच्या बायकोचा अपमान केला ते आवडलं का म्हणून चिडून पुसलं. माझा मालक ह्यामुळं थोडा धीरावर आला.

ह्या सर्व प्रकारानं घरात मात्र वणवा उठला. वडील, सासरा, बहीण सर्वच वाटेल तसं बोलू लागली अशी कशी जलमली आमच्यात ? तू इतकी नालायक कशी ? आमचं कुणाचं मानत नाहीस हे काय चालवलय ? असे एक ना अनेक प्रश्न व प्रदूषणं दिली.

दरम्यान वर सरकार-दरबारी हालचाल झाली. प्रकरण दाबून टाकवं म्हणूनही प्रयत्न झाले. पण त्यातही यश आलं नाही. मधल्या काळात पोलीस अधिकारी मला भेटायला आले तेव्हा मी नव्हते. तर पुन्हा दुसऱ्या दिवशी येऊन मला काही त्रास नाही ना वगैरे विचारपूस करून गेले.

त्या काळात गावकऱ्यांना अटक झाली. ते जामीनावर सुटले. देऊळ, शाळा तपासणी, पालकांकडे चौकशी इ. पोलीसांकरवी चौकशी चालू झाली. हळूहळू लोकांनी ही बाई देवळात येते ते असह्य झाल्याचं कबूल केलं. मला देवळातून घालवावं म्हणून पूर्वी मीटिंगाही झाल्याची कबूली मिळाली.

पर हे इथंच थांबलं नाही.

मी कोंडीत चिमटली.

गावकऱ्यांनी मग एकदा फतवा काढला.

आमच्या समाजानं ओढ्याच्या पल्याड यायच नाही. आमच्यापैकी कुणालाचं मजूरीवर घ्यायच नाही-दुकानात सामान मिळायच नाही. शेतीकरिता नांगर मिळणार नाही आणि आमच्या सर्व समाजाच्या तोंडचं पाणी पळालं.

सर्वजणांनी आमच्या घरी कोंडाळ केलं. मुलीला घरी ठेवू नका. हिच्यामुळं साऱ्या गावाला त्रास होतो म्हणून सांगू लागले. मी त्यांना म्हटलं ठीक आहे, मी इथं राहणार नाही पण माझ्यामुळं तुम्हाला हा सर्व त्रास सुरू झालाय असं मला लिहून द्या. अर्थातच जमलेल्यांनी अस काही करण्यास नकार दिला.

मी कोंडीत चिमटली.

गावकऱ्यांचा दबाव समाजावर-समाजाचा आमच्या घरच्यांवर अन् घरच्यांचा माझ्यावर.

रात्रभर रोज हा कुटाना चालू असायचा.

गावकऱ्यांना केसची भीती–ते पुढाऱ्यांचा पाठलाग करायचे.

सतत हे असं बीन अब्रूचं वागणं. कधी कधी वाटायचं जीव द्यावा म्हणून.

घरात राहिलं की दिवसभर शिवीगाळ.

नवऱ्याच्या छळानंही बेजार होऊन जायची. मग दिवसभर बाहेर मीटिंगला जाणं हा पर्याय मी शोधला. दोन महिने मानसिक त्रास सहन केला.

संघटनेच्या पाठबळामुळं या सर्वांपुढं खंबीरपणे उभं राहता आलं.

आता व्यवहार पुन्हा सुरळीत चालू झाले. 'मी तुमच्या जातीचंच देणं नाही, सर्वांचच देणं लागतो असं गावकऱ्यांना सांगून सुतारान आमच्या समाजाचीही काम करण्यास सुरुवात केली. मग हळूहळू सर्व व्यवहार सुरू झाले.

पण गाव माझ्यावर वचपा काढायची संधी शोधतच होतं.

माझ्या मुलीला मागणं आलं अन् मुलीच्या लग्नाच आयतच निमित त्यांना मिळालं.

लग्न ठरलं आणि समाजाने गावात सभा घेऊन मागच्या (अपमानाचा ) बदला घ्यायच ठरवलं.

या लग्नावर बहिष्कार घालायचा म्हणून सभेत ठरलं आणि तसं आजूबाजूच्या गावांनाही चिठ्ठ्या गेल्या.

आई म्हणून मला काय करावं ते सुचेनासं झालं. पण आल्या प्रसंगाला तोंड देणं तर भाग होतं.

मी म्हटलं, "मुलगी घेणाऱ्यानी कबूल केलंय; मी देणार, ते घेणार बस्स! नाहीतरी बाजारात एक देणार व एक घेणार असे दोघेच असतात ना !

नवरा–बायकोनं एकमेकांच्या गळ्यात हार घालून हे लग्न पार पाडायचं असं मी ठरवलं.

नाही म्हटलं तरी मी थोडंसं घाबरले. लग्न होई-पर्यंत माझ्या जीवात जीव नव्हता. मग पुण्यातील एक वकील श्री. भाऊसाहेब वाघमारे, श्री. पी. एस. गायकवाड इ. पुढारी, महिला मंडळातील ४–५ बाया इ. ना बोलवून घेतलं.

सर्वजण जमले अन् मग गावातील सारी मंडळीही हळूहळू जमा झाली. लग्न पार पडलं. पोरीच्या डोक्यावर अक्षता पडली. आज १।। वर्ष होतंय पण आज मी नवऱ्यापासून अलग आहे. नवऱ्यानी मला सोडलं. कारण मी संघटनेच्या कामानिमित्त बाहेर जाते.

आता नवरा म्हणतो नांदवतो पण घराबाहेर जायचं नाही. पण मी ठरवलंय मला हे काम करायचंच. आता मला पुढाऱ्याची, अधिकाऱ्याची भीती नाही. आता ह्या सर्वांमधून मी खूप शिकले. बायांना आसंच शिकावं लागेल, नेटानं उभं रहावं लागेल.

मी हुशार झाले. खर तर मला काहीही येत नव्हतं. ४ थी पर्यंत शिकलेली पण मी सहीही विसरली होती. आता मला नवा जन्म मिळाला....

– शब्दांकन : रमाकांत पाटील

---

## गोडबोले यांच्या पुस्तकाला पुरस्कार

पर्यावरणाचे अभ्यासक आणि धरणग्रस्तांच्या प्रश्नां-साठी काम करणारे येथील कार्यकर्ते तसेच हाकाराच्या संपादक मंडळाचे सदस्य जगदीश गोडबोले यांच्या 'मोहीम इंद्रावतीची' या पुस्तकाला मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे कै. प्रा. अनंत काणेकर साहित्य पारितोषिक मिळाले आहे.

तीन हजार रुपयांचे हे पारितोषिक प्रसिद्ध साहित्यिक प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या हस्ते श्री. गोडबोले यांना मुंबईत नुकतेच देण्यात आले.

प्रा. गाडगीळ, शां. शं. रेगे आणि डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

श्री. गोडबोले यांनी लिहिलेले 'प्रेरणा चिपकोची–भटकंती गढवालची' हे पुस्तकही पारितोषिक देण्याच्या योग्यतेचे असल्याचे मत परिक्षक समितीने व्यक्त केले आहे

प्रा. काणेकर याच्या स्मृतिप्रित्यर्थ काव्य, नाटक आणि प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकारामधील सर्वोत्कृष्ट पुस्तकाला हे पारितोषिक दरवर्षी देण्यात येते.

---

# जागतिक महिला परिषद, नैरोबी

केनयातील नैरोबी येथे जुलैमध्ये झालेल्या महिलांच्या जागतिक परिषदेत कम्युनिटी एड अॅब्रॉड (CAA-INDIA) या संस्थेच्या क्षेत्र संचालक (Field Director) सौ. एच. बेदी सहभागी झाल्या होत्या. या परिषदेत त्यांनी एक निबंधही सादर केला. 'हाकारा' च्या प्रतिनिधींनी या परिषदेसंबंधी सौ. बेदी यांची घेतलेली मुलाखत येथे देत आहोत.

☐ नैरोबी येथील जागतिक महिला परिषद कोणी आयोजित केली होती? परिषदेचा हेतू व विषय काय होता?

सौ. बेदी : या परिषदेची पार्श्वभूमी प्रथम स्पष्ट करायला हवी. १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जगभर साजरे करण्यात आले. यानिमित्ताने महिला वर्गाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न जगभर सुरू झाले. १९७५ मध्ये मेक्सिको येथे जागतिक महिला परिषद झाली. त्यानंतर १९८० मध्ये कोपनहेगन येथे दुसरी परिषद झाली १९७५-८५ या दशकात महिलांच्या विकासासाठी जगभर झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यासाठी नैरोबी येथील जागतिक महिला परिषद जुलै १९८५ मध्ये United Nations ने आयोजित केली. या परिषदेत प्रामुख्याने विकास, शांतता व समानता या तीन विषयांच्या अनुषंगाने चर्चा झाली. ही परिषद दोन प्रमुख भागात झाली. दि. १०-१९ जुलै दरम्यान झालेल्या परिषदेस जगभरातील बिनसरकारी व स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते. या परिषदेसाठी १५७ देशांतून सुमारे ११,००० प्रतिनिधी आले होते. भारतातून ३०० प्रतिनिधी आले होते. या परिषदेत सहभागी होण्याची संधी मला मिळाली. 'Attempts to organise women in rural areas' या विषयावरील निबंध मी या परिषदेत सादर केला. दि. १५-२६ जुलै दरम्यान झालेल्या दुसऱ्या परिषदेस जगभरातून सरकारी प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले होते. या परिषदेस भारतातून १४ प्रतिनिधी उपस्थित होते.

☐ परिषदेतील चर्चेतून कोणत्या महत्त्वाच्या/उल्लेखनीय बाबी पुढे आल्या?

परिषदेत निरनिराळ्या विषयांवर १०० चर्चा-कृतीसत्रे झाली. त्यापैकी आमच्या गटात 'महिला व विकास' यावर चर्चा झाली. विविध देशांतून अंगिकारण्यात आलेल्या विकास कार्यक्रमांमागच्या तात्त्विक भूमिकांची चर्चा प्रामुख्याने झाली. चर्चेअंती काही निष्कर्ष काढण्यात आले व त्याआधारे शिफारशी करण्यात आल्या.

१. परिणामकारक महिला विकासासाठी मोठ्या प्रमाणावरील कार्यक्रमापेक्षा लहान प्रमाणावरील कार्यक्रमांवर भर देण्यात यावा.

२. विकास कार्यक्रमांच्या नियोजनाच्या सर्व पातळींवर महिलांना सहभागी करून घेण्यात यावे. नियोजन प्रक्रियेमध्ये संरचनात्मक बदल (Structural Change) झाल्याशिवाय महिला विकास कार्यक्रम खऱ्या अर्थाने यशस्वी होणार नाहीत.

३. स्वतःकडे तसेच दुसऱ्यांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणात बदल झाला पाहिजे.

४. जगात सर्वत्र महिलांचा दर्जा दुय्यम आहे. तिसऱ्या जगातील देशातील महिलांचे प्रश्न सर्वसाधारणतः सारखेच आहेत,

☐ या परिषदेसंबंधी आपले सर्वसाधारण मत काय झाले?

माझी मते/निरीक्षणे वैयक्तिक आहेत. मला वाटतं, इतिहासात प्रथमच जगभरातल्या स्त्रिया एवढ्या मोठ्या संख्येने एकत्र आल्या हे या परिषदेचे वैशिष्टय म्हणून नमूद करावे लागेल. जगाच्या कानाकोपऱ्यातून छोट्या छोट्या देशातूनही महिला आल्या होत्या. केनयातील महिला तर मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. विशेष म्हणजे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व थरातील महिला सहभागी झाल्या होत्या. या परिषदेमुळे अनेक देशातील महिलांना परस्परांशी ओळखी करून घेता आल्या, गप्पागोष्टी करता आल्या, एकमेकांचे अनुभव समजून घेता आले, हा या परिषदेचा फार मोठा लाभ म्हणता येईल.

या परिषदेतील चर्चेच्या उणीवाही स्पष्ट करणे आवश्यक आहे. चर्चा वाजवीपेक्षा अधिक तात्विक व पुस्तकी स्वरुपाच्या झाल्या. महिला कार्यकर्त्यांचे जिवंत अनुभव पुढे येणे जरुर होते, तसे ते आले नाहीत. ग्रामीण व आदिवासी स्त्रियांच्या प्रश्नांवर विशेष चर्चा झाली नाही. यापुढील परिषदांमधून स्थानिक पातळीवरील अधिकाधिक महिला कार्यकर्त्यांना सहभागी करून घेणे जरुर आहे. यापुढची परिषद १९९० मध्ये भारतात मद्रास येथे भरविण्याचे ठरविण्यात आले. तेथे या दिशेने अधिक प्रयत्न होतील अशी आशा आहे.

⬭⬭⬭

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सचिव व पुणे विद्यापीठाच्या मानवशास्त्र विभागातील प्रपाठक प्रा. रा. के. मुटाटकर यांची गांधी मेमोरियल लेप्रसी फाऊंडेशन वर्धा या संस्थेच्या 'सेंटर फॉर सोशल सायन्स रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट इन लेप्रसी' चे संशोधन-सल्लागार म्हणून दोन वर्षासाठी प्रतिनियुक्ती करण्यात आली आहे. प्रा. मुटाटकर यांचा वर्धा येथील पत्ता असा :

**प्रा. रा. के. मुटाटकर**
गांधी मेमोरियल लेप्रसी फाऊंडेशन,
हिन्दीनगर, वर्धा ४४२ १०३.

## आदिवासी संघर्ष समितीच्या वतीने आदिवासी मेळाव्याचे आयोजन

**बोटोणी (चिचोणी)** : १३ मार्च १९८५ ला स्थानिक कार्यकर्त्यांच्या वतीने "आदिवासी संघर्ष समितीची" स्थापना करण्यात आली. या समितीच्या वतीने दिनांक ९ जून १९८५ ला आदिवासी आश्रम शाळा, बोटोणी ता. मोरगांव, जि. यवतमाळ येथील प्रांगणावर आदिवासी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विदर्भातील एका छोट्याशी गावी ही चळवळीची प्रक्रिया सुरू झाल्याची ही नांदी होय. स्थानिक कार्यकर्ते, मुख्याध्यापक, कर्मचारी वृंद (सहकारी सोसायटीचे) यांच्या परिश्रमामुळे हा मेळावा घेण्यात आला होता.

मेळाव्याचे प्रास्ताविक भाषण करताना आदिवासी संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री. बाबूलाल सिडाम यांनी आदिवासी संघर्ष समितीची निर्मिती का करण्यात आली याचे विवेचन केले.

प्रास्ताविक भाषणानंतर "आदिवासी भारता"चे संपादक श्री. राजाभाऊ राजगडकर उद्घाटन करताना म्हणाले, बाबूलाल सिडाम हेच खरे आजचे उद्घाटक म्हणून शोभले असते. खरं दुखणं आज त्यांच्याच मुखातून ऐकायला मिळाले हे विशेष होय. आजपर्यंत आदिवासींच दुखण दुसरेच सांगत असायचे.

याबरोबरच श्री. बाबूराव आडे, सौ. पुष्पा आतराम, नेताजी उईके यांनीही मार्गदर्शन केले.

शेवटी अध्यक्षीय भाषण यशवंत नैताम यांनी केले.

या मेळाव्याला एकूण ३०० लोक उपस्थित होते. पाहुण्यांचे स्वागत समारंभानंतर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली होती. या मेळाव्याचे संचालन मुख्याध्यापक श्री. गेडाम यांनी केले तर आभारप्रदर्शन बाबूलाल सिडाम यांनी केले. स्थानिक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन मेळावा यशस्वी करून दाखविला.

आदिवासी संघर्ष समिती ही नव्याने उदयास आलेली संघटना आदिवासींच्या प्रत्येक समस्या हाताळण्यासाठी वचनबद्ध असल्याचे सांगून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

— सुभाष आडे

**भारतावर एक दृष्टिक्षेप**

| | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|
| साक्षरता : | ४७% | १९% |
| संसदेत — | ५१४ | २८ |

# विकासातील स्त्रियांची भूमिका

समाजातील पक्षपाती प्रथा, परंपरा, कायदे, आर्थिक धोरण तसेच धार्मिक संकल्पनांचे पगडे, स्त्रियांमधील जागृतीचा अभाव, पुरुषी वर्चस्वाचा स्वीकार, पत्नी व मुलगी यांचे कुटुंबातील स्थान, कुपोषण तसेच आरोग्यातील अनेक अडथळे, वाजवीपेक्षा अधिक मुले होणे यासारख्या अनेक गोष्टींमुळे पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे स्थान अजूनही दुय्यम आहे.


सर्व देशांमध्ये स्त्रियांची संख्या जवळपास ५०% असूनही स्त्रियांचे मानवी हक्क सहजगत्या नाकारले जातात. यामुळे स्त्रिया व विकास या प्रश्नांचा सखोल विचार करण्याची वेळ आलेली आहे.

ग्रामीण शेतीप्रधान अर्थव्यवस्थेत स्त्रियांची भूमिका दिसून येते. पुरुष व स्त्रियांच्या कामामध्ये फरक असला तरीही उत्पादनप्रक्रियेतील स्त्रियांचा वाटा कमी नाही. अभ्यासाअंती दिसून आले आहे की घरगुती कामांव्यतिरिक्त पाणी आणणे, सरपण गोळा करणे यात स्त्रियांचा निम्मा वेळ जातो. समकालीन विकास-योजनांमुळे व शेतीतंत्राच्या आधुनिकीकरणामुळे स्त्रियांच्या सहभागावर प्रतिकूल परिणाम झालेला आहे. स्त्रियांनी केलेल्या कामांना योग्य ती मान्यता कुठेच मिळत नाही.

ही परिस्थिती निर्माण होण्यास अनेक कारणे आहेत. बहुतेक विकास योजनांमधून कल्याणकारी कामांसाठी एक विशिष्ट गट म्हणून स्त्रियांकडे पाहण्यात येते व सर्वसाधारण विकास योजनांतून स्त्रियांना वगळण्यात येते. शेतीतंत्राचे प्रशिक्षण, भाजीपाला लागवड, पशुपालन या कार्यक्रमांचा रोख प्रामुख्याने पुरुषांवरच असतो. त्या त्या भागाच्या अर्थव्यवस्थेमध्ये दुय्यम स्थान असलेली शिलाई, लोणची बनवणे यासारखी कामे स्त्रियांना देण्यात येतात याचा अर्थ असा की प्रमुख आर्थिक प्रक्रिया जी शेती यामधील स्त्रियांचा वाटा नाकारण्यात येतो. स्त्रियांच्या कामाना अनुत्पादक समजण्यात येते.

तसेच काही कामे स्त्रियांना करता येत नाहीत. हा अपसमज अधिक दृढ करण्यात येतो. वस्तुतः हे खरे नाही. कित्येक पुरुषांनी नोकरीधंद्यानिमित्त शहरात किंवा आखाती देशांत स्थलांतर केल्यामुळे पुरुष करत असलेली कामे स्त्रिया करीत आहेत. काही कामे स्त्रियांनी न करण्यामागील अपसमज यांत्रिकीकरणामुळे फोल ठरले आहेत. उदा. पूर्वी स्त्रियांना नांगरण्यास मनाई होती, नवीन ट्रॅक्टरद्वारा नांगरण्याचे काम स्त्रिया करू शकतात.

याकरिता विकास कार्यक्रम/योजनांमध्ये स्त्रिया व पुरुष दोहोंचा समावेश झाला पाहिजे. विशेषतः अर्थोत्पादनाच्या योजनांमध्ये स्त्रियांसाठी वेगळे कार्यक्रम ठेवण्यात येऊ नयेत. मात्र वर्षानुवर्षे चालत आलेले अपसमज दूर करण्यासाठी व दृष्टिकोन बदलण्यासाठी सर्वच प्रकल्प व योजनांमध्ये स्त्रियांसाठी वेगळी तरतूद करणे आवश्यक आहे. ती यासाठी की स्त्रियांना विकास योजनांच्या फायद्यापासून वंचित ठेवण्यात येऊ नये. तसेच यापुढे त्यांना कमी मजुरी देण्यात येऊ नये. समान कामासाठी समान मोबदला मिळवून देणारे कायदे असले पाहिजेत, ज्या देशात असे कायदे अगोदरच अस्तित्वात आहेत. त्यांची नीट अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे.



स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग नसतो. ही एक फार मोठी उणीव आहे व ती दूर करणे आवश्यक आहे. दिवसभरात घराबाहेरील कामे केल्यानंतर घरी परतल्यानंतर घरातील कामे करावी लागत असल्याने इतर कामांसाठी स्त्रियांना अजिबात वेळ मिळत नाही. शतकानुशतके स्त्रियांना घरापुरतेच मर्यादित ठेवल्यामुळे स्त्रियांचा आत्मविश्वास कमी झालेला असतो. समाजातील प्रौढ व वयस्कर स्त्रीपुरुष स्त्रियांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करण्याच्या विरुद्ध असल्याने स्त्रिया स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेत सहभागी होत नाहीत. स्वत:चे निर्णय स्वत: करण्यासाठी व आत्मविश्वास वाढण्यासाठी स्त्रियांच्या पंचायत संस्थांचा चांगला उपयोग होऊ शकेल.

स्त्रियांवर होणाऱ्या वाढत्या अत्याचारामुळेही सार्वजनिक जीवनात भाग घेणे स्त्रियांना अशक्य होऊन बसते व त्या घरात कोंडल्या जातात.

दक्षिण आशियातील काही देशांमध्ये मुस्लिम कायदा लागू करण्यात आल्यामुळे स्त्रियांविषयीचा पक्षपात वाढला आहे. इस्लाम धर्म स्त्रियांबाबत पक्षपात करत नसला तरी काही धार्मिक समजुतींचे चुकीचे अर्थ लावून स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्यात येते. उदा. पोषाखाबाबतीत निर्बंध, सार्वजनिक कार्यक्रमात भाग घेण्यावर नियंत्रणे, शैक्षणिक व नोकरीच्या संधीचा अभाव व लग्नविषयक पुरुषधार्जिणा कायदा.

**शिफारशी :**

स्त्रियाचा समान दर्जा मान्य करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आर्थिक, सामाजिक व राजकीय सर्व क्षेत्रातील पक्षपात नाहीसा करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले पाहिजेत.

आर्थिक प्रक्रियेतील स्त्रियांचे योग्य श्रेय त्यांना देण्यासाठी शिरगणतीतील economic activity, household worker, head of household इ. च्या व्याख्या बदलण्यात आल्या पाहिजेत.

तांत्रिक बदलांचा श्रमिक / कष्टकरी स्त्रियांवर होणारा परिणाम ताबडतोब ध्यानात घेतला पाहिजे. नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण स्त्रियांना देण्यात येऊन ती ती यंत्रे चालविण्याचे काम स्त्रियांना अग्रहक्काने देण्यात आले पाहिजे.

शेती व तत्सम क्षेत्रातील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये स्त्रियांकडे पुरेसे लक्ष देण्यात आले पाहिजे स्त्रियांवरील इतर जबाबदाऱ्या लक्षात घेऊन प्रशिक्षण कार्यक्रम आखण्यात यावेत.

ग्रामीण भागामध्ये शेतीवर आधारित उद्योग उभारण्यात यावेत. यामुळे स्त्रियांना गावापासून जवळ रोजगार मिळू शकेल.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील विकास व मदत कार्यक्रमांमध्ये स्त्रियांच्या गरजा व समस्या याकडे पुरेसे लक्ष देण्यात आले पाहिजे.

कमी वेतन, कामाचे जादा तास, कामाठिकाणचे आरोग्यविघातक वातावरण या गोष्टी टाळण्यासाठी ग्रामीण भागात देखील कामगार कायदे लागू करण्यात आले पाहिजेत.

समान कामासाठी समान मोबदला हे तत्त्व कायद्याने अंमलात आले पाहिजे व जेथे हे कायदे अगोदरच अस्तित्वात आहेत तेथे त्यांची योग्य अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे.

स्त्रियांना जमीनमालकीचे समान अधिकार मिळावेत यासाठी जमिनीसंबंधीच्या कायद्यामध्ये आवश्यक ते बद्दल करण्यात यावेत.

रुग्णांची सेवाशुश्रुषा व हस्तकला इ. तील स्त्रियांच्या पारंपारिक कौशल्यांना प्रोत्साहन देण्यात आले पाहिजे व आधुनिकीकरणामुळे स्त्रियांच्या या कौशल्यांवर प्रतिकूल परिणाम होऊ देऊ नये.

विशेषत: ग्रामीण भागात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांना कायद्याने प्रतिबंध करण्यात आला पाहिजे म्हणजे स्त्रिया निर्भयपणे सार्वजनिक जीवनात सहभागी होऊ शकतील.

स्त्रियांसाठी नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे घेण्यात यावीत. गावपंचायती, पंचायत समित्या इ. प्रशासकीय व विकास संस्थांमध्ये स्त्रियांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे.

संदर्भ : Conclusions and Recommedations of the Seminar on Rural Development and Human Rights in South Asia, December 1982. International Commission of Jurists and Human Rights Institute, Lucknow.

## मला उध्वस्थ व्हायचंय

# स्त्री मनाचा उद्रेक

☐ विनीता सामंत

स्वतःवर पिढयान्‌पिढया होत आलेला अन्याय निमूटपणे सहन करणे हे परमकर्तव्य स्त्री बराच काळ करीत आलेली आहे आणि कदाचित पुढेही करत रहाणार आहे. या अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मलिका अमरशेखनी आपल्या आत्मचरित्रात केला आहे.

### सामाजिक कार्यकर्त्यांची स्त्रीविषयक पारंपारिक भूमिका :

त्यांच्या अनुभवाचा नुसताच एका स्त्रीचा वैयक्तिक अनुभव एवढेच मोल नाही. त्या अनुभवाला अजून इतर महत्त्वाचे पदर आहेत. यातली सर्वात महत्त्वाची बाब अशी की मलिका ही एका समाजकार्यकर्त्याची पत्नी आहे. एक समाजपरिवर्तनाचे काम करणारा कार्यकर्ताच आपली पुरुषी मनोवृत्ती व पुरुषप्रधान संस्कृती स्त्रीवर कसा लादत जातो याचा तीक्ष्ण आलेख या कथनातून उमटतो. मलिकाचा हा वैयक्तिक अनुभव सामाजिक कार्यात गुंतलेल्या विवाहित स्त्रीपुरुषांच्या एका मोठ्या प्रश्नाला तोंड फोडतो. सामाजिक कार्यकर्त्यांचे स्त्रीविषयक मूल्यपरिवर्तन होत नाही तोवर समाजपरिवर्तनाचा सारा रोख एकांगी राहील. स्त्रीची ही भूमिका आता बदलत चाललेली आहे. पारंपारिक पुरुषप्रधान व्यवस्था कळत नकळत झिरपू देणाऱ्या परिवर्तनाच्या चळवळीला मलिकाचा हा उद्रेक खूप काही शिकवू शकतो, आव्हानं देऊ शकतो. सुरुवातीलाच ती म्हणते. "मला एक स्त्री म्हणून या पुरुषप्रधान संस्कृतीकडे न्याय मागायचाय. माझ्यापुढे माझी भूमिका स्पष्ट आहे." या विवेचनाचा अर्थ असा नाही की परिवर्तनाची चळवळ स्त्रीविरोधी आहे. उलटपक्षी काही कार्यकर्ते आपल्या आयुष्यात जाणिवपूर्वक या संबंधाने बदल करू पहात आहेत, प्रयोग करू पहात आहेत. मात्र अनेकजण तसेच पुढे रेटत निघालेलेही आहेत. ही बाब नजरेसमोर आणणे जरुरीचे आहे. पतीच्या, एक सार्वजनिक कार्यकर्ता या नात्याने झालेल्या ससेहोलपटीत भाग न घेण्याचा निश्चय करून "वेगळा मेंदू, विचार करण्याची ताकद असताना स्त्रीने स्वतःला मिटवून पुरुषी वर्चस्व का स्वीकारावं ?" हा प्रश्न तिने मांडलेला आहे.




शाहीर अमरशेख आणि कुसुम जयकर हे मलिकाचे आईवडील. त्यांच्या आंतरधर्मिय विवाहामुळे घरात आपली जात म्हणजे "माणूस" असे उत्तर देण्याचे तिला वळण. मध्यमवर्गीय बालपण लाडात आणि कलाकार मन जोपासण्यात गेलेले. त्यातून कवीमन हुंकारलेले. तिनं लिहिलंय 'माझी कविता प्रत्येक कवितेगणिक चेहरा बदलू लागली. पण एक गोष्ट मला आजतागायत न कळलेली, म्हणजे माझ्या कवितेत सामाजिक संदर्भ, दुःख व कुठल्या न कुठल्यातरी दारिद्र्याबद्दलची चीड हे येऊ लागलं होतं. त्यातूनच मोठ्या बहिणीचे पती, प्रसिद्ध लेखक अनिल बर्वे यांच्यामुळे नामदेवराव ढसाळांशी झालेली ओळख, ढसाळांची दलित पँथर या दलितांच्या संघटनेची चळवळ लोकप्रियतेच्या लाटेवर होती तेव्हा ! "संवेदनाशील

मर्दानी, कलंदर तरी हळवा– माझ्यावर प्रेम करणारा कवी असं त्याचं वर्णन जाणवलेले ! ढसाळांशी विवाह केला तेव्हा त्यांच्या पूर्वायुष्याबद्दल काहीच नसलेली माहिती त्यांना खटकली नाही पण नंतर दलित पँथर-मध्ये हळूहळू पडत गेलेली फूट, पैशाचा अभाव, पतीचं शिवराळ वागणं, भरमसाठ दारू पिणं, मारहाण, वेश्यागमन, अव्यवहारी स्वभाव, इतर व्यसनं या सर्व दुर्दैवाच्या दशावतारांनी वेड लागण्याची पाळी त्यांच्या-वर आली. "लवकर पदरात पडलेल्या यशाची हवा अपयशानं आलेलं फ्रस्ट्रेशन" यामुळे ढासळलेल्या पतीला सावरणं शक्य नव्हतंच पण स्वतःला सगळी व्यसनं व महाभयंकर रोग जडला. कुठून या विषम विध्वंसक आणि विस्कळीत लोकात येऊन पडलो ही भावना पक्की झाली.

## मध्यमवर्गीय व दलितांमधली सांस्कृतिक भेग :

मलिका अमरशेखच्या वैवाहिक जीवनातील अनुभवाचे दुसरे पोत आहे मध्यमवर्गीय व दलितांच्या सांस्कृतिक भेगेचे आणि यामुळे तयार होणाऱ्या ताण-तणावांचे. मलिकाने आपल्या आईवडिलांच्या आंतर-सांस्कृतिक वैवाहिक जीवनाचा सखोल आढावा या पुस्तकात घेतला असता तर या अनुभवाला अजून एक परिणाम लाभले असते. या ताणतणावाविषयीची प्रतिमा मुलाला कसे वाढवावे याबाबतचे निर्णय घेताना तीव्रपणे उमटतात. या प्रक्रियांची तीव्रता आणि चिवटपणा यांची गंभीरपणे नोंद घेतली पाहिजे. तरच एकात्मता आणि एकात्मतेत स्वायत्तता म्हणजे काय ? अशा राष्ट्रीय पातळीवर चर्चेचा विषय झालेल्या कल्पनांची वैयक्तिक जीवनातील अनुभूती कशी असते व असावी याचा माग आपण घेऊ शकू.


सुशिक्षित व उच्चवर्णिय संस्कारातून बालपण गेलेल्या त्यांची, मुलांवर ब्राह्मणी संस्कार करण्याची धडपड, नवऱ्याच्या रागाला कारणीभूत ठरते. त्यावर त्यांचं म्हणणं, "तो ब्राह्मणी संस्कृतीचा झाला तरी हरकत नाही. पण तुझ्यातला एकही दोष मला त्याच्यात यायला नकोय. शिव्या देऊन लोकांवर दादागिरी करण्यापेक्षा माझ्या मुलानं पूर्णतः मध्यमवर्गीय झालेलं चालेल मला."

दलित समाजात अतिशय सहजपणे शिव्यांचा वापर होतो. तो जणू एक सांस्कृतिक वारसाच आहे. याची दोन अंगे आहेत. शिवराळपणाने आपल्याला नाक मुरडायला लावणाऱ्या संस्कृतीतून अतिशय रोखठोकपणे आणि उघडेपणाने भावना व्यक्त होतात. पण यातली अजून एक मेख अशी की बऱ्याच मोठ्या शिव्या या स्त्रीशी, तिच्या पारंपारिक योनिशुचितेशी निगडीत असतात. म्हणजे शिव्यांमधून पुन्हा एका पारंपारिक स्त्रीत्वाची कल्पनाच जोपासल्या जात रहाते. रोज खऱ्या जीवनाचा हा भाषिक संदर्भच आपली अनेक मूल्ये बनविण्यास सहजगत्या कारणीभूत होतो. मलिका अमरशेख या संदर्भाचा कडाडून विरोध का करतात व नामदेव ढसाळ त्याला चिकटून रहातात, हा सांस्कृतिक तणाव बोचका आहे, गंभीर आहे. आपल्या मुलाने मध्यमवर्गीय झालं तरी चालेल हा मलिका अमरशेख यांचा वैयक्तिक सुझाव आहे. त्यापलिकडे जाऊनही हा प्रश्नाला समजून घेण्याची निकड तयार होते.

मुलीने खचून जावे इतका हा विदारक अनुभव मलिका अमरशेखनी उघडा केलेला आहे. त्यांच्याच शब्दात पराभव माणसाला खूप काही शिकवून जातो हे खरंच. पण महत्त्वाचं म्हणजे तो स्वतःला ओळ-खायला लागतो. स्वतःची कुवत, मर्यादा, सामर्थ्य पण या पराभवाच्या अनुभवानं मी बरीच श्रीमंत झाले. 'अनुभवानं... आत्मविश्वासानं... केळीची साल काढावी तशी मी माझ्याभोवतालची ढोंगी, खोटी न् दिखाऊ आवरणं फेकून दिली...' मलिका अमरशेख यांनी जे आत्मकथन केले आहे. त्यातील अनुभव परिपक्व आहे असे नाही. त्यांच्यामधून विरोधाची तीव्र प्रतिक्रिया उमटते. मात्र आपल्या समग्र परिस्थिती-विषयी त्यांनी सखोल चिंतन करून तिचे आकलन झाले आहे व योग्य कृतीचे भान आले आहे असा या पुस्तकाचा दावाही नाही, उद्देशही नसावा. मलिका अमरशेखच्या आत्मकथनाला मोल आहे ते या सर्व अनुभवातून, आपली स्त्री म्हणून झालेली वाटचाल त्या सर्वांसमक्ष ठेवतात म्हणून. त्याचे लिखाण म्हणजे केवळ स्टंटबाजी आहे का ? हा प्रश्न इथे प्रस्तुत नाही मध्यमवर्गीय खाजगीपणाचे मूल्य त्यांनी नाकारले याची नोंद घ्यायला हवी.

### संवेदनाहीन समाजात जगतांना :

ही आपापल्या जिवंत अनुभवाची पोळणारी आंच मध्यमवर्गीय स्त्रिया अनुभवतील व मांडतील तसतसा त्यांच्यावर असलेला बेगडी मराठी मासिकांचा प्रभाव कमी होऊन त्या आपल्या सत्य परिस्थितीविषयी जागरूक होतील अशी आशा अशा प्रकारच्या आत्मकथनातून पुढे येत. मलिका अमरशेख यांचा शारीरिक अनुभवांचा तपशील हा या आत्मनिवेदनाचा एक अतिशय महत्त्वाचा भाग आहे. हा तपशील एक दस्तऐवज म्हणून मोलाचा आहेच. आपल्या समाजातील पारंपारिक दुहेरी अशा लैंगिक नितीमत्तेकडे आपल्याला डोळे उघडून पहाणे तो भाग पाडतो. (लैंगिक अनुभवाचे स्त्री व पुरुष हे दोघे जरी सारखेच वाटेकरी असले तरी स्त्रीच्या विशिष्ट शारीरिकतेमुळे तिला एक वेगळ्या स्तरावरचा शारिरीक अनुभव मिळतो. मूल जन्माला येणे ही घटना स्त्रीसाठी अतिशय समाधानकारक असू शकते तशीच ती वेदनाकारक पण असते.) गर्भपातासारख्या अनुभवाच्या मानसिक आणि शारीरिक परिणामांना स्त्रीला सामोरे जावे लागते अशा वेळेस तिला तिच्या सहचराच्या संवेदनाशीलतेची जोड मिळाली तर ती या अनुभवातून सामोरी होवू शकते. मात्र प्रत्यक्षात आपल्या



समाजात याबाबत कमालीची संवेदनाहिनता दिसते. इतकी की स्त्रीला स्वत:लाच वाटते की हा आपला भोगवटा आपणच भोगायचा. हे सोशिकतेचे मूल्य नाकारले तर आपल्याला आपल्याच शारीरिकतेचे बाभाडे दिसून येतात. मलिका अमरशेखने आपल्या आयुष्यातील गर्भपाताचे प्रसंग सांगितले आहेत ते या संवेदनाहिन पुरुषीवृत्तीविषयी चिड आणतात. या प्रसंगामुळे हळूहळू आपण शरीरसंबंधाला का माघारू लागलो याचा तपशील तिने दिलेला आहे. यालाच जोडून नामदेव ढसाळ यांच्या लग्नबाह्य संबंधाची नोंद येते. असे संबंध ठेवणे आपल्या समाजातील दुहेरी नितीमत्तेमुळे पुरुषांना सोपे होतात, याचा मलिकाने स्वत:कडे उलगडा केलेला आहे. तिने लिहिलंय प्रेम अनेकांवर करणं शक्य असतं हे मला कधी कुणी शिकवलंच नव्हतं. म्हणजे प्रेम या स्वाभाविक वृत्तीचा वेगळा आविष्कार पुरुषासाठी व स्त्रीयांसाठी वेगळा अशी आपल्या समाजाची उतरंड. आजच्या परिस्थितीत स्त्रीपुरुष संबंधातला शारीरिक पूलच खरा असे विधान तिने केले आहे. हे विधानही फार बोलकं आहे. भावनिक आणि बौद्धिक उपासमारीचा वसा घेऊन अनेक स्त्रिया ह्या पुलावरून वाटचाल करतात. ही जी वृत्ती वाटचाल करत राहण्यासाठी 'मूकाटयाने सोसणे' हे जे मूल्य आहे त्यालाच हे पुस्तक नेमका हादरा देते. मलिका अमरशेख यांनी या पुस्तकात आणलेले अजून एक वास्तव म्हणजे आपल्या मुलाशी असलेलं त्याचं नातं. मुलाच्या सान्निध्यात त्यांना पुन्हा सापडणारे शैशव आणि स्त्रीपुरुषांच्या नात्याच्या गुंतागुंतीत मुलांचा निर्दयपणे होणारा वापर.

मलिका अमरशेख यांनी एखादे कांड घडून गेल्यावर त्याची कथा सांगावी या वृत्तीतून काही लिहिलेले नाही. आयुष्यातल्या एका मधल्याच टप्प्यावर उभे राहून त्यांनी या पुस्तकाचे लिखाण केले आहे. यापुढे त्यांच्यापुढे कोणती दिशा आहे हे या निवेदनातून स्पष्ट होत नाही त्यांनी पुस्तकाच्या शेवटी म्हटल्याप्रमाणे काही क्षण मुखवटा काढून ठेवल्यावर आत जे चित्र दिसते त्याचे इथे चित्रण आहे. स्त्रीमुक्ती चळवळीसाठी आस्था असणाऱ्यांनी वाचलच पाहिजे असं हे एक आत्मचरित्र आहे.

## स्त्रियांच्या प्रश्नांना वाहिलेले नियतकालिक

# मानुषी

स्वातंत्र्यानंतर तीस वर्ष स्त्रियांच्या प्रश्नांवर विशेष विचारविनिमय झालाच नाही. १९७५ च्या आणीबाणीनंतर देशामध्ये एक नवे राजकीय युग अवतरले. नागरी स्वातंत्र्य, लोकशाही हक्क संरक्षण व वृत्तपत्र स्वातंत्र्य यांना राजकीय आघाडीवर महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. आणीबाणीमध्ये वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी झाल्यामुळे आपल्या स्वातंत्र्याबद्दल वृत्तपत्रे विशेष सावध झाली. तसेच शोषण व दडपशाहीविरुद्ध चाललेल्या संघर्षाकडे वृत्तपत्रांनी लक्ष वळवले. या कालखंडात लहानमोठ्या राजकीय गटांनी पुढाकार घेऊन अनेक नवी नियतकालिके उदयास आणली.

**मानुषीचा जन्म :**

'मानुषी' हे त्यातीलच एक नियतकालिक. 'मानुषी' ने स्त्रियांच्या समस्यांवर लक्ष केंद्रीत करण्याचे ठरवले. आम्ही दिल्ली विद्यापीठातील विद्यार्थिनी, प्राध्यापिका यांच्या स्त्री अधिकार मंचाने या नियतकालिकाची कल्पना प्रथम पुढे आणली. ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब, भूमीहीन स्त्रियांचा संघर्ष तसेच उत्तराखंडातील चिपको आंदोलनाने अशा प्रकारचे नियतकालिक सुरू करण्यास चालना दिली. आणीबाणीपर्यंत वृत्तपत्रे ग्रामीण भागातील प्रस्थापितांविरुद्ध स्त्रियांनी केलेल्या संघर्षाकडे दुर्लक्ष करीत होती त्यामुळे अशा संघर्षाची माहिती मिळवून अशा आणखी संघर्षांना चालना देण्यासाठी ती माहिती नियतकालिकाद्वारे प्रसिद्ध करण्याची निकड वाटत होती दुसरा एक महत्त्वाचा उपक्रम आम्ही 'मानुषी' द्वारे हाती घेतला तो म्हणजे देशाच्या विविध भागातील भिन्न भिन्न जाती, वर्ग, समूहातील स्त्रियांच्या परिस्थितीविषयी माहिती जमविण्यास प्रोत्साहन देणे. भारत हा विशाल देश असल्यामुळे भिन्न भिन्न भागातील परिस्थिती वेगवेगळी असते. वेगवेगळ्या भागातील व थरातील स्त्रियांच्या जीवनक्रम व समस्यांविषयी शहरी स्त्रियांमध्ये अज्ञान असते व त्यामुळे शहरी व ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न एकच असल्याचा भ्रम निर्माण होतो. माहिती हे एक सामर्थ्य असल्याचे आम्हाला अनुभवांती प्रत्ययास आले आहे प्रश्नांची नीट जाण नसेल तर त्यावर परिणामकारक उत्तरही सापडणे कठीण होते. चुकीच्या माहितीमुळे चुकीच्या मागण्या पुढे येऊन विरोधाची धार कमी होण्याचा धोका असतो.

**स्त्रियांच्या अनुभवाचे पुनर्मुल्यांकन :**

'मानुषी'च्या पहिल्या अंकामध्ये पुढील उद्दिष्टचे निश्चित करण्यात आली होती.

व्यक्तिगत व सामाजिक पातळीवरील शोषण व दडपशाहीविरूद्ध स्त्रियांच्या मनात प्रश्न उभे करणे.

योग्य परिवर्तनासाठी व्यापक चर्चा सुरू करणे.

समान संघर्षासाठी समान जाणीव निर्माण करणे.

स्त्रियांच्या संघटना व कार्यकर्ते यांना एकत्र आणणे.

अधिकाधिक स्त्रियांपर्यंत पोहोचणे.

स्त्रियांच्या ऐतिहासिक अनुभवांना वाचा फोडून त्यांचे पुनर्मूल्यमापन करणे.

प्रसिद्धी माध्यमांनी निर्माण केलेली स्त्रियांची चुकीची प्रतिमा बदलणे व स्त्रियांचे खरे प्रश्न पुढे आणणे.

देशाच्या विविध भागातील स्त्रियांविषयी माहिती संकलित करणारी यंत्रणा उभारणे.

आर्थिक व्यवहारासंबंधी आम्ही काही ठाम निर्णय घेतले.

१) कोणत्याही देशी अथवा परदेशी संस्थेकडून देणगी घ्यावयाची नाही.

२) देणग्यांसाठी श्रीमंतांवर अवलंबून न रहाता व्यक्तिगत छोट्या देणग्यांतून निधी उभारायचा.

३) जाहिराती घेताना स्त्रीचे भडकचित्र रंगविणाऱ्या जाहिराती स्वीकारावयाच्या नाहीत.

स्त्रियांच्या चळवळीविषयी सहानुभूती बाळगणाऱ्या हितचिंतकांचे कायम पाठबळ मिळविण्याचा हा प्रयत्न होता व तो यशस्वी झाला. मोठ्या देणग्या न स्वीकारल्यामुळे स्वायत्तता व स्वातंत्र्य मिळाले जाहिरातींवर फार अवलंबून न राहण्याचे ठरवल्याने 'मानुषी' नियमित प्रसिद्ध होऊ लागले. 'मानुषी'च्या आम्ही कार्यकर्त्या विनावेतन काम करणाऱ्या असल्याने खर्चाचा बोजा कमी झाला.

**अशिक्षित स्त्रियांपर्यंत कसे जायचे ? :**

देशाच्या सर्व भागात, सर्व थरात 'मानुषी' जाते. काही महिला पत्रकारांनी आपणहून 'मानुषी'विषयी

परीक्षण लेख लिहिले. विविध भाषातील वृत्तपत्रांनी 'मानुषी'तील लेख अनुवादित करून प्रसिद्ध केले. कित्येक ठिकाणी 'मानुषी'मुळे स्त्रियांच्या प्रश्नांवरील चर्चेला चालना मिळाली त्याचप्रमाणे स्त्रियांचे नवीन गट/संघटना निर्माण झाल्या. काही गटांनी आपापल्या प्रादेशिक भाषांमध्ये छोटी नियतकालिके सुरू केली.

'मानुषी' हिंदी व इंग्रजीमध्ये प्रसिद्ध करण्यात येते. ज्या बहुसंख्य स्त्रियांच्या प्रश्नांना 'मानुषी' द्वारे वाचा फोडण्यात येते त्या स्त्रिया अशिक्षित आहेत. त्यांचेपर्यंत 'मानुषी' कसे पोहोचेल याची चिंता आम्हाला आहे. यासाठी ग्रामीण तसेच शहरी गरीब महिलांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांपर्यंत 'मानुषी' पोहचवण्याचे प्रयत्न आम्ही केले. या कार्यकर्त्या प्रौढ शिक्षण वर्गात 'मानुषी' वाचून दाखवितात. 'मानुषी' द्वारे मांडण्यात आलेल्या कल्पना प्रत्यक्ष आपल्या कार्यात उतरवण्याचा प्रयत्न काहींनी केला आहे. 'मानुषी'द्वारे मांडण्यात आलेल्या कल्पना व माहिती यांची व्याप्ती वाढली आहे.

## 'मानुषी'साठी कोण लिहितात ? :

मानुषी'चे काही वाचक व हितचिंतक 'मानुषी'चे लेखक व वार्ताहर झाले आहेत. सर्व लेखन, छायाचित्रे, सजावट विनावेतन होते. काहीजणांनाच अगोदर लिखाणाचा अनुभव होता. चळवळी संघटित करणारे व चळवळीत भाग घेणारे कार्यकर्ते वृत्तांत पाठवतात. काहीना लिहिणे अवघड जाते त्यांचे लिखाण आम्ही सुधारून प्रसिद्ध करतो. प्रादेशिक भाषांतील अहवाल अनुवादित करतो.

मानवशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास इ. विषयांमध्ये महत्त्वपूर्ण संशोधन करणाऱ्या स्त्रियांकडून लिखाण मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करतो. या लिखाणाची भाषा सोपी करून त्या त्या विषयाचे ज्ञान नसलेल्यांनाही या लिखाणातील महत्त्वपूर्ण माहिती समजावी यासाठी आम्ही प्रयत्न करतो. या संशोधनातून ज्यांच्या जीवनाविषयी लिहिण्यात येते त्या स्त्रिया व संशोधिका यांतील अंतर कमी करून उपयुक्त चर्चा व्हावी असे आम्हाला वाटते.

## 'मानुषी'चे काम आम्ही कसे करतो ?

आम्हाला या प्रकारच्या कामाचा पूर्वी अनुभव नसल्याने सर्वच स्वयंसेवी कार्याप्रमाणे कामाला व्यवस्थित पद्धत व शिस्त लावणे फार अवघड गेले.

'मानुषी'ची दैनंदिन जबाबदारी कोण घेणार हे स्पष्ट नसल्याने जबाबदारी 'सामुदायिक' ठरविण्यात आली. कोणाचीही नावे द्यायची नाहीत असे ठरले. स्त्रियांच्या चळवळीच्या दिशेने तो एक सामुदायिक प्रयत्न व्हावा हा हेतू. विशिष्ट लोकांना विशिष्ट भूमिकाअशा रितीने मानुषीचे काम चालू नये असा प्रयत्न होता. तसेच झाले असते तर नवीन लेखक/लेखिका त्यापासून दूर राहिले असते. 'मानुषी'च्या नियमित कार्यकर्त्यां व्यतिरिक्त त्यांच्या अनेक मित्र-मैत्रिणींनीही कामात मदत केली.

मात्र नियतकालिक पूर्णपणे स्वयंसेवी प्रयत्नावर चालू शकेल ही कल्पना अवास्तव ठरली. कामात रस असणाऱ्या स्त्रिया आपापल्या वेळाप्रमाणे काम करू शकतील असे वाटले. परंतु नियतकालिक नियमित प्रसिद्ध होण्यासाठी त्यास स्वतःचे असे एक वेळापत्रक असले पाहिजे, प्रत्येकाच्या लहरीवर अवलंबून राहणे योग्य नाही हे आमच्या ध्यानात आले. काही कार्यकर्त्या गंभीरपणे काम करीत नव्हत्या. ज्यांना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे त्यांनी काही जबाबदारी उचलावी व विशिष्ट वेळ काम करावे असे सुचविण्यात आल्याने तणाव निर्माण झाला. विशिष्ट जबाबदारी घेऊन विशिष्ट वेळ कामाची बांधीलकी मानणाऱ्या कार्यकर्त्यांनाच निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येईल असे ठरविण्यात आले. इतरांनी प्रासंगिक मदत करावी मात्र त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही असे ठरले. मग 'मानुषी' स्त्रियांच्या एका गटातर्फे प्रकाशित करण्यात येते असे आम्ही म्हटले.


## घरातल्यांची नाराजी :

'मानुषी' चे काम करणाऱ्या काही कार्यकर्त्यांना त्यांच्या घरातल्यांची नाराजी पत्करावी लागली. 'मानुषी' चे काम केल्यास शिक्षण बंद करण्याची किंवा घरातून हाकलून लावण्याची धमकी काहींना त्यांच्या पालकांनी दिली. त्यांच्या वाचनावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न झाले. तसेच त्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्यात आले. काही पालकांनी आपल्या मुलींची लग्ने उरकून टाकली— त्यांनी 'मानुषी' शी संपर्क ठेवू नये यासाठी. काही स्त्रियांच्या नवऱ्यांनी पत्नीला 'मानुषी' चे काम करता येऊ नये यासाठी आपल्या राहण्याच्या जागा बदलल्या.

'मानुषी'च्या कामात मदत करणाऱ्या कित्येक स्त्रियांना या प्रकारच्या कामाचा अगोदर अनुभव नव्हता. जेव्हा एखादी स्त्री आपणहून 'मानुषी' च्या कामासाठी पुढे येते तेव्हा ती कोणत्या राजकीय विचारसरणीची आहे याचा विचार करण्यात येत नाही. तिचा नियमितपणा व प्रामाणिकपणा याचाच विचार करण्यात येतो व तिला आवडेल ते काम ती करते.

**(मानुषीच्या सौजन्याने)**


# आदिवासी जमीन हस्तांतर परिषद : वृत्तांत



परिषदेस उपस्थित असलेले कार्यकर्ते

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व आदिवासी जाणीव जागृती केंद्र यांनी १३ जुलै ८५ रोजी हमाल भवन, गुलटेकडी (पुणे) येथे आयोजित केलेल्या आदिवासींच्या जमीन हस्तांतर प्रश्नासंबंधीच्या परिषदेस महाराष्ट्राच्या विविध भागातील आदिवासींत काम करणारे अनेक कार्यकर्ते आजी–माजी आमदार व या प्रश्नांचे अभ्यासक उपस्थित होते. परिषदेच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत डॉ. बाबा आढाव होते.

या परिषदेचे प्रमुख संयोजक श्री शरद कुलकर्णी यांनी या परिषदेचा हेतू विशद करून आदिवासींच्या जमीन हस्तांतराच्या ज्वलंत प्रश्नाचा सविस्तर ऊहापोह आपल्या विवेचनात केला. वर्तक समितीच्या शिफारशींनुसार महाराष्ट्र सरकारने दोन कायदे जारी केले. त्यापैकी पहिल्या कायद्यात आदिवासींच्या जमिनींचे बिगर आदिवासींकडे हस्तांतरण होण्याच्या प्रक्रियेला परिणामकारक आळा घालणाऱ्या तरतुदी होत्या तसेच आदिवासींच्या बेकायदेशीररित्या हस्तांतरित झालेल्या



परिषदेत विचार मांडतांना – विवेक पंडित

जमिनी त्यांना परत मिळवून देणाऱ्या तरतूदी होत्या. (महाराष्ट्र लँड रेव्हिन्यू कोड अँण्ड टेनन्सी लॉज (अमेंडमेंट) ॲक्ट १९७४ (कायदा क्र. ३५/७४) दुसऱ्या कायद्यात खरेदी-विक्री, अदलाबदल, भेट यासारख्या वरकरणी कायदेशीर मार्गांनी मात्र प्रत्यक्षात जबरदस्ती आणि लांडीलबाडीच्या मार्गांनी हस्तांतरीत झालेल्या जमिनी आदिवासींना परत मिळवून देण्याविषयीच्या तरतुदी होत्या. (महाराष्ट्र रिस्टोरेशन ऑफ लॅण्डस् टू शेड्यूल्ड ट्राईब्ज ॲक्ट १९७४ कायदा क्र. १४/१९७५). या कायद्याची अंमलबजावणी सुरू होताच हितसंबंधियांनी उच्च न्यायालयातून स्थगिती आदेश मिळवले. यासंबंधी दोन प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या अपिलांचा एकत्रित निकाल सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर १९८४ मध्ये दिला आहे. या कायद्यावरील सर्व आक्षेप सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यामुळे आता या कायद्याच्या अंमलबजावणीत कोणताही कायदेशीर अडसर राहिलेला नाही असे स्पष्ट करून आदिवासी जमीन मालकांना त्यांच्या हस्तांतरित जमिनी मिळवून देण्यासाठी घालून दिलेल्या तीन वर्षांच्या मुदतीत वाढ करावी व तशी दुरुस्ती मूळ कायद्यात करावी तसेच सरकारने आपल्या आश्वासनाप्रमाणे अशा प्रकरणांची चौकशी करण्यास खास अधिकारी नेमून अशी प्रकरणे निकालात काढावी अशी मागणी त्यांनी केली. तसेच या कायद्याची अंमलबजावणी झाल्यास २०,००० हून अधिक आदिवासी कुटुंबांना त्यांच्या हस्तांतरित जमिनी परत मिळणार असल्याने आदिवासींच्या विकासासाठी झटणाऱ्या सर्वच कार्यकर्त्यांनी, लोकप्रतिनिधींनी तसेच सरकारने योग्य पावले उचलावीत. विशेषत: आदिवासीत काम करणाऱ्या संघटना व कार्यकर्ते यांनी या प्रश्नावर संघटित होऊन लढा द्यावा असे आवाहन त्यांनी केले.

या प्रश्नाचा प्रत्यक्ष अनुभव असलेले सेवानिवृत्त तहसिलदार व श्रमजीवी संघटनेचे कार्यकर्ते श्री. रा. वि. भुस्कुटे यांनी आदिवासींच्या जमीन हस्तांतराचा प्रश्न महसूल खात्यातील अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे तसेच भ्रष्टाचार व लाचलुचपत यामुळे तसेच गाव पातळीवरील सरकारी सेवकांनी केलेल्या चुकीच्या नोंदीमुळे निर्माण झाल्याचे प्रतिपादन करून या कायद्यामुळे सामाजिक न्याय व समता प्रस्थापित होण्यास मदत होणार असल्याने प्रस्थापितांकडून या कायद्याची अंमलबजावणी न करण्याची दडपणे येत असल्याने या कायद्याची नीट अंमलबजावणी होत नाही असा स्पष्ट आरोप केला व यावर उपाय म्हणून या कायद्याच्या अंमलबजावणीचे काम महसूल खात्याकडे न देता यासाठी वेगळे न्यायाधिकरण नेमून त्याचेकडे चौकशी व अंमलबजावणीचे काम द्यावे व या न्यायाधिकरणावर त्या त्या भागातील आदिवासींच्या संघटनेचा प्रतिनिधी; आदिवासी आमदार व जिल्हा कायदा सहाय्यक समितीचा प्रतिनिधी असावा अशी मागणी केली. आदिवासी नेते भूमीसेनेचे श्री. काळूराम दोधडे यांनी केवळ कायदा आदिवासींच्या बाजूचा असून उपयोग नाही तर कायद्यामागे आदिवासींचे संघटित पाठबळ उभे केले तरच या कायद्याची नीट अंमलबजावणी होऊ शकेल हे निदर्शनास आणून या कायद्याच्या अंमलबजावणीस हितसंबंधितांचा प्रखर विरोध होईल हे ध्यानात घेऊन त्याला खंबीर प्रतिकार करण्यास आदिवासी कार्यकर्त्यांनी तयार राहिले पाहिजे याची जाणीव करून दिली.

या कायद्याचे विधेयक विधान सभेत सर्वप्रथम मांडणारे व वर्तक समितीचे सदस्य माजी राज्यमंत्री श्री. रमेश वळवी यांनी या कायद्यातील तरतुदींची पार्श्वभूमी व त्यांचे महत्त्व विशद केले व कायद्याला संघटनेचे पाठबळ असेल तरच हा प्रश्न सुटेल हे स्पष्ट केले.

ठाणे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीचे सभापती सोनू कोंडू गोविंद यांनी सर्व आदिवासी आमदारांनी या प्रश्नाबाबत पक्षविरहीत ठाम भूमिका घेतली पाहिजे असे आवाहन केले.

गडचिरोलीचे आदिवासी आमदार श्री. हिरामण वरखेडे यांनी सर्व आदिवासी आमदारांनी या प्रश्नावर ठाम भूमिका घेऊन शासनाला ठणकावून सांगितल्यास हा प्रश्न सोडविणे शासनाला भाग पडेल असा विश्वास व्यक्त केला.

प्रदीप प्रभू, विवेक पंडित, जनार्दन वळवी, सुरेखा दळवी, धरमचंद चोरडिया इत्यादींनीही या प्रश्नांवरील आपले विचार या परिषदेत व्यक्त केले.

डॉ. बाबा आढाव यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात आंदोलन व्यापक पातळीवर झाल्याशिवाय कोणत्याही प्रश्नांची तड लागत नाही याची जाणीव करून देऊन मूलभूत परिवर्तनाच्या बाबतीत सर्वच राजकीय पक्षांनी काहीच बोलायचे नाही अशी भूमिका घेतलेली दिसते हे परखडपणे सांगितले. व्यापक स्वरूपाची आंदोलने उभारताना आकाशवाणी, दूरदर्शन या प्रभावी प्रसार माध्यमांचाही उपयोग करून घेण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. तसेच लिखाणाद्वारे आपल्या अनुभवांची देवाण-घेवाण करण्यास कार्यकर्त्यांनी शिकावे असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

या परिषदेचे प्रास्ताविक महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सचिव प्रा. रामचंद्र मुटाटकर यांनी केले तर श्रीमती छायाताई सुरतवंती यांनी आभारप्रदर्शन केले.

शेतकरी संघटनेचे शरद जोशी, महाराष्ट्र जनता पक्षाचे भाई वैद्य, शंकरराव खरात इत्यादी मान्यवरही या परिषदेस आवर्जुन उपस्थित होते.



# वेठबिगार मुक्त झाले... पण पुढे काय?

मुरबाड तालूक्यात काम करणाऱ्या श्रमिक मुक्ती संघटनेच्या पुढाकाराने दि. २५–३–८५ रोजी पहिली पांच वेठबिगारांची तुकडी मुक्त झाली. त्याच दिवशी या मुक्त वेठबिगारांना जगण्यासाठी तातडीने खावटी मिळावी, सावकार व गुंडांपासून संरक्षण मिळावे व त्यांचे एकंदर पुनर्वसन व्हावे, अशा मागण्या अध्यक्षा दक्षता समिती (वेठबिगारी उच्चाटन) जिल्हादंडाधिकारी यांच्याकडे केल्या. दि. २६–३–८५ रोजी वेठबिगारांचे पुनर्वसन व त्यांच्या केसेस चालवण्यासाठी नेमलेले खास अधिकारी श्री. पर्वतेसाहेब यांना प्रत्यक्ष भेटून गटविकास अधिकारी-मुरबाड यांच्या नावाने मुक्त वेठबिगार पुनर्वसनासाठी रितसर आदेश मिळवला (वि. का. द. / वेठबिगार / १४–८५ जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे २६–३–८५) व तो दि. २७–३–८५ ला गटविकास अधिकारी मुरबाड यांना समक्ष देण्यात आला.

दि. २७–३–८५ रोजी मा. युवक कल्याण मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे 'आंतरराष्ट्रीय युवक वर्षा-निमित्त सर्व वेठबिगार युवक असल्याने, त्यांच्या पुनर्वसनासाठी काही योजना आहेत का, या हेतूने पत्र लिहिले. (त्यांनी नंतर दि. १–७–८५ ला पुनर्वसनाची योजना बनवून पाठवा. त्यावर जमल्यास विचार करता येईल असे उत्तर पाठवले.)

### तहसीलदार कचेरीतच जबरदस्तीने खोटे जबाब लिहून घेतले :

याच दरम्यान श्री. गुलाबराव वसंतराव देशमुख, श्री. गुलाबराव नामदेवराव देशमुख, व श्री. भालेराव या मुक्त वेठबिगारांच्या संबंधित सावकारांनी वेठबिगारांना जबरदस्तीने, दमबाजी करून मुरबाड येथील तहसिलदार कार्यालयात खोटे फेरजबाब देण्यास भाग पाडले व त्यांच्याकडून ते लग्नगडी कधीच नव्हते, असे खोटे लिहवून घेतले. आश्चर्याची गोष्ट अशी की, ज्या तहसिलदार कार्यालयाने वेठबिगारीतून मुक्त होण्यासाठी वेठ-बिगारांचे जबाब नोंदवून घेतले. त्याच कार्यालयाने त्यांच्याकडून वेठबिगार नसल्याचे भितीच्या वातावरणात दिलेले फेरजबाब विनादिक्कत नोंदवून घेतले. मुक्त वेठबिगारांना तातडीची मदत व पोलीस संरक्षणाची मागणी करून सुद्धा ते न मिळाल्यामुळे केवळ भयाण परिस्थितीच्या गुलामीतून हे सर्व घडले. याची परिसीमा म्हणजे या ५ वेठबिगारांपैकी एक मुक्त वेठबिगार श्री. बारकू मंदू कडाळे हा अजून न्याहाडीच्या श्री. गुलाबराव वसंतराव देशमुख यांच्या पिठाच्या गिरणीत कष्टप्रद काम करीत आहे. (नव्हे त्याला काम करावे लागत आहे.)

ठाणे जिल्हा वेठबिगारी उच्चाटन कृती समिती-मार्फत मुरबाड तालुक्यातील वेठबिगारांना पोलीस संरक्षण द्यावे ही मागणी करणारे पत्र डी. एस. पी. (ग्रामीण) ठाणे व त्वरित पुनर्वसन करा या मागणीचे पत्र अध्यक्षा–दक्षता समिती–वेठबिगारी उच्चाटन / जिल्हादंडाधिकारी यांना पाठवले.

### चोरांच्या उलटचा बोंबा :

दरम्यानच्या काळात न्याहाडी येथे मुरबाड व शहापूर तालुक्यातील १००/१५० सावकारांची एक मोठी सभा झाली. त्यामध्ये खालीलप्रमाणे जाहिरपणे ठराव घेण्यात आले. ते असे— (१) श्रमिक मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांना त्वरित मुरबाड तालुक्यातून हाकलून देण्यात यावे. (२) संघटनेत सामील असलेल्या गरीब आदिवासींना खावटी, नांगरटीसाठी बैल, रेडे देऊ नयेत व त्यांची ऐन पावसाळच्या तोंडावर कोंडी करून त्यांना अद्दल घडवावी इ. यासर्व गोष्टीमुळे त्या भागातील गरिब आदिवासींचे मनोधैर्य खचले. त्यांची परिस्थिती त्रिशंकूसारखी होऊ लागली. ते घाबरले.

### आपण कष्टकरी ताठ मानेने सभा घेऊ शकतो

अशा परिस्थितीत त्यांचे नितीधैर्य कायम टिकावे. त्यांचे मनोबल वाढावे या हेतूने श्रमिक मुक्ती संघटनेने

त्याच गावात दि. ९-४-८५ रोजी सर्व गरीब, कष्टकरी लोकांची एक जोरदार सभा आयोजित केली. त्यामध्ये श्री. विवेक पंडित– सदस्य दक्षता समिती व अध्यक्ष श्रमजीवी संघटना– ठाणे, श्रीमती विद्युलता पंडित, सेक्रेटरी, विधायक संसद, श्री. रमाकांत पाटील, आदिवासी जाणीव जागृती केंद्र, पुणे, श्रीमती इंदवी तुळपुळे व श्री. विजय साठे यांची आवेशपूर्ण भाषणे झाली. सावकाराच्या गावात जिथे कार्यकर्त्यांचे हातपाय मोडण्यात येतील अशा धमक्या दिल्या होत्या, अशा ठिकाणी आपणही गरीब, कष्टकरी लोक ताठ मानेने सभा घेऊ शकतो व तीसुद्धा अगोदर जाहीर करून, या भावनेने लोकप्रतिमा, त्यांचे मनोबल नक्कीच वाढले. अर्थात या सभेसाठी संघटनेने पोलीस संरक्षण मागितले होते. पण दोन पोलीस न्याहाडीत आले होते. कशासाठी, तर श्री. गुलाबराव वसंतराव देशमुख यांना व त्यांची संपती राखायला. (अशा आशयाची मागणी श्री. गुलाबरावांनी पोलीस स्टेशनकडे केली होती.) सभा संपल्यावर लोकांची पांगापांग झाल्यावर मात्र मा. पी. एस. आय. साहेब आपली जीप घेऊन फेरफटका मारावयास आले होते हे नाकारता येणार नाही.

ही सर्व एकंदर परिस्थिती, श्रमिक मुक्ती संघटनेचा परिचय करून देणारे व श्री. विजय साठे यांना मारहाण होण्याची भिती असल्याबद्दलचे जोड प्रतिज्ञापत्र सुप्रिम कोर्टात दाखल केले. (मूळ रिट पिटिशन श्रमजीवी संघटनेने दाखल केले आहे. क्र. १५०३/८४.)

आधी नमूद केल्याप्रमाणे ५ वेठबिगारांचे खोटे फेरजबाब दाखल केल्यावर ते कलेक्टरांनी अमान्य केले व परत प्रत्यक्ष जागेवर जाऊन फेरजबाब घेण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना मिळाले. त्याप्रमाणे नायब तहसिलदार स्वत: न्याहाडी गावास गेले व गुन्हेगार सावकार श्री. गुलाबराव वसंतराव देशमुख यांच्याच प्रशस्त घरात संबंधित गड्यांना बोलावून जाब जबाब घेतले !

दि. २९–४–८५ रोजी आणखी तीन वेठबिगारांच्या तुकडीची संघटनेच्या पुढाकाराने रितसर मुक्तता झाली. त्यांनाही पोलीस संरक्षण मिळावे, तातडीने खावटी व एकंदर पुनर्वसन त्वरित व्हावे, अशी संबंधित अधिकाऱ्यांकडे त्याच दिवशी मागणी करण्यात आली.

## शेवटी तोंडाला पानेच पुसणार कां ?

एक महिनाभर वाट पाहून आतापर्यंत मुक्त झालेल्या ८ वेठबिगार कुटुंबांना संरक्षण, तातडीची खावटी व एकंदर त्वरित पुनर्वसनाची (कायदेशीर) मागणी अध्यक्षा–वेठबिगारी उच्चाटन– दक्षता समिती / जिल्हा दंडाधिकारी यांचेकडे केली.

दरम्यान आधी पत्रव्यवहार केल्यामुळे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था–पुणे यांचेकडून दि. ३।५।८५ रोजी प्रादेशिक व्यवस्थापक महाराष्ट्र आदिवासी सहकारी व विकास महामंडळ– जिल्हा ठाणे यांना मुरबाडमधील वेठबिगारांना पावसाळ्यापूर्वी खावटी मिळावी म्हणून पत्र आले. (क्र. आ. सं. सं /का– १/८४–८५) संबंधित जव्हार येथील कार्यालयाने लगेचच तशी खावटी देण्याचे स्थानिक आदिवासी सोसायटच्या (टोकावडे व धसई) यांना तातडीचे आदेश दिले. (प्रा. क्र. आलीम / प्रावाज प्रशा / १ / ८५ खा. वाटप /३७२३) अर्थात स्थानिक आदिवासी सहकारी सोसायटच्या स्थानिक हितसंबंधिय मंडळींचे डावपेच आले व एवढे होऊनसुद्धा अजून कोणत्याही वेठबिगाराला स्थानिक सोसायटीमार्फत खावटी वाटप झालेले नाही !

दि. २१–६–८५ पर्यंत आणखी तीन वेठबिगार संघटनेमार्फत मुक्त झाले. त्यांनाही तातडीने खावटी, पोलीस संरक्षण व एकंदर पुनर्वसन अशा मागण्या संबंधित अधिकाऱ्यांकडे केल्या.

श्रमिक मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांना आता एकटे-दुकटे फिरणे मुश्कील झाले आहे. विशेष करून श्री. विजय साठे यांना मारण्याच्या सतत धमक्या कानावर येऊ लागल्या म्हणून श्री. विजय साठे यांनी अशा आशयाची तक्रार व प्रतिबंधात्मक उपाययोजना व्हावी, या मागणीचे पत्र मा. पी. एस्. आय. मुरबाड यांना दिले. पत्र वाचून मा. पी. एस्. आय. मुरबाड मिस्किल हासले व काहीच बोलले नाहीत ! (दि. २९–६–८५)

आधी मुक्त झालेल्यांपैकी एक मुक्त वेठबिगार श्री. चिमा रामा निरगुडा हा दि. २५–६–८५ रोजी आपल्या गावकऱ्याच्या शेतात भाताची लावणी

करावयास गेला असता, त्याचा पूर्वीचा सावकार श्री. गुलाबराव नामदेवराव देशमुख फांगणे यांनी केवळ सूडबुद्धीने त्यास मारहाण केली. म्हणून दि. २९-६-८५ रोजी श्री. चिमाला संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये नेले व सावकार श्री. गुलाबराव नामदेवराव देशमुख यांचा जामीन रद्द व्हावा, अशी लेखी मागणी केली. त्यावेळी मा. पी. एस्. आय. साहेबांनी श्री. चिमाला प्रश्न विचारले ते खडचा चढचा आवाजात, जणू काही चिमाच गुन्हेगार आहे, या स्वरात ! जामीन रद्द मागणीपत्राच्या प्रती त्याच दिवशी अध्यक्षा-दक्षता समिती वेठबिगारी उच्चाटन /जिल्हाधिकारी डी. एस्. पी. (ग्रामीण) ठाणे, इ. ना. पाठवल्या.

तसेच दुसरा एक मुक्त वेठबिगार श्री. रघुनाथ विठ्ठल मुकणें (कातकरी-आदिवासी), रा. किशोर यास त्याचा सावकार (पोलीस पाटील ! ) श्री. जानू लक्ष्मण गायकर रा. किशोर यांच्याकडून सतत दमबाजी, शिवीगाळी, गावचे प्रतिष्ठित (तथाकथित) पंचमंडळी बसवून त्याला हुसकावून लावण्याचे प्रयत्न, दोन हजार रुपये घे पण केस काढून टाक अशी दडपणे व गावात रघुनाथला त्यांच्या कुटुंबातील इतर मुक्त वेठबिगारांना (त्याची पत्नी व बहिण) साधे फिरणे कठीण होऊ लागले, म्हणून दि. ११-७-८५ रोजी सावकाराचा जामीन ताबडतोब रद्द व्हावा, अशी लेखी मागणी केली. या मागणीच्या प्रती अध्यक्षा - दक्षता समिती - वेठबिगारी उच्चाटन, डी. एस. पी. (ग्रामीण) ठाणे, यांना पाठवल्या. तसेच दि. १२-७-८५ रोजी प्रांत-ऑफिसर ठाणे; (उप विभागीय अधिकारी) यांच्याकडे पोलीस पाटील श्री. जानू लक्ष्मण गायकर यांची पोलीस पाटीलकी रद्द व्हावी, अशी कायदेशीर मागणी केली आहे.


आत्तापर्यंत मा. अध्यक्षाबाईंनी (कलेक्टर, ठाणे) यांनी मोठ्या सहृदयतेने दोन मुक्त वेठबिगारांना (चिमा निरगुडा व काळु कडाळे) यांना प्रत्येकी रु. ५०/- एवढी आर्थिक मदत ! व पुष्कळ विलंबाने का होईना पण प्रत्येकाला २० किलो धान्य (दोघांना मिळून ४० किलो) दिले व सर्व वेठबिगारांच्या तोंडाला पाने पुसली !

एवढे सोडून अजूनपर्यंत काहीही झालेले नाही. तातडीची मदत नाही की एकंदर पुनर्वसन नाही. सर्व गोष्टींची परिसीमा म्हणजे सामाजिक न्याय धुळीस मिळाला आहे. एकाही संबंधित सावकारावर खटला सुरू झालेला नाही. असे का, हे श्री. पर्वतेसाहेब यांना विचारले असता, याचे उत्तर '**गोपनीय**' असे सांगतात. २ सावकारांचे जामीन रद्द होणार की नाही, हे यामुळे समजायला मार्ग नाही.

या सर्व एकंदरीत प्रकरणांमुळे कितीतरी गरीब आदिवासींना सावकारांनी खावटी दिली नाही. (एका-अर्थी ते चांगलेच झाले नाही तर दिडी दुपटीने त्यांना परत करावे लागले असते.) काही गरिबांच्या गोठ्यातून सावकारांनी नांगरटीसाठी दिलेले बैल / रेडे सोडून घेऊन गेले.

अशा परिस्थितीत घटनेच्या कलम ३८, ४१, ४२, ४३, इ. ची सरकारला आठवण करू द्यावीशी वाटते. 'रायसेनमधील दगडाच्या खाणीतील वेठबिगारांच्या प्रकरणात' नुकताच सर्वोच्च न्यायालयाने निकालपत्रात असंघटित, असुरक्षितांना संरक्षण देणे ही सरकारी घटनात्मक जबाबदारी आहे, असे म्हटले आहे. मग हे सरकार आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडणार आहे की नाही ?

**विजय साठे**
श्रमिक मुक्ती संघटना
ताडआळी, पो. ता. मुरबाड
जि. ठाणे ४२१ ४०१






## १.

आदिवासी, शेतमजूर व अल्प उत्पन्न गटातील लोकांना कसण्यासाठी स्वतःची जमीन मिळावी म्हणून महाराष्ट्र सरकारने कुळकायदा, कमाल जमीन धारणा कायदा इत्यादी कायदे केले. तसेच सरकारकडे असलेली नापिक व जंगल विभागातील अतिरिक्त जमीन आदिवासी व भूमीहिनाना वाटण्याचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यानुसार काही आदिवासींना जमिनी मिळाल्या हे खरे, परंतु आदिवासींनी मिळालेल्या जमिनी बऱ्याच प्रमाणात त्यांच्याकडे राहिल्या नाहीत व त्यांचे बिगर-आदिवासींकडे हस्तांतर होत राहिले व सरकारचा हेतू असफल झाला. त्यासाठी कै. वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात मी महसूलमंत्री असताना, १९७१ साली माझ्या अध्यक्षतेखाली या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीच्या शिफारशीनुसार आदिवासींच्या हस्तांतरित जमिनी त्यांना परत मिळवून देण्याविषयी १९७४ साली कायदा करण्यात आला. त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने हस्तांतरण रोखण्यासाठी एक यंत्रणा निर्माण करण्यात आली त्यानुसार ठाणे जिल्ह्यात जव्हार, पालघर व डहाणू तालुक्यासाठी प्रत्येकी एक अशा तीन तहसीलदारांची हस्तांतर प्रकरणे शोधून काढण्यासाठी नेमणूक करण्यात येऊन कामास सुरुवातही करण्यात आली. त्यांनी या तालुक्यात अशी ३१४४ प्रकरणे शोधून काढली व बहुतेक सर्व ठिकाणी आदिवासींना जमिनी परत मिळवून देण्यात आल्या. धुळे जिल्ह्यातही अशी प्रकरणे आढळून आल्यावर तेथेही खास अधिकाऱ्याची नेमणूक करून आदिवासींना त्यांच्या जमिनी परत करण्यात आल्या. आदिवासींनी त्यांच्या हस्तांतरित जमिनी परत मिळण्यासाठी अर्ज करण्याची मुदत वाढवून मिळणे व कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विशेष अधिकाऱ्यांची नेमणूक करणे या आपल्या दोनही मागण्या या संदर्भात रास्त वाटतात.

आदिवासी लोकांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी राज्य शासनाने कायदे केले. परंतु आदिवासी समाजातील पराकोटीचे दारिद्र्य व कमालीचे अज्ञान यामुळे त्यांचा लाभ त्यांच्या पदरात पडला नाही. आणि म्हणून तो मिळवून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांची नेहमीच तीव्रतेने गरज जाणवते. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व आदिवासी जाणीव जागृती केंद्र या सारख्या संस्था ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करीत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

आपला,

**भाऊसाहेब वर्तक**

मुंबई

---

## २.

हाकारा आला म्हणजे त्याचे संपूर्ण वाचन अवश्य होत असते. कार्यकर्त्यांना हाकारा मार्गदर्शक तर आहेच. आदिवासी क्षेत्रात कार्यप्रवण राहण्याची प्रेरणा जागृत ठेवीत असतो. आपण पाटीलवाडी प्रकरण व अंबरलिंग महाराज विशेषांक काढावा अशी सूचना करू इच्छितो.

आपला विश्वासू,

**लक्ष्मण कदम**

संयोजक,

भारतीय कष्टकरी संघटना

मु. पो. शहादा, जि. धुळे.

---

## ३.

हाकारा वर्ष सहावे, अंक पहिला वाचला. सर्व अंक वाचनीय आहे. त्यातल्या त्यात श्री. शरद कुलकर्णी यांचा 'महाराष्ट्रातील प्रतिरोधात्मक चळवळी' हा लेख किमान वेतन गीत विशेष आवडले.

सुधीर जोग ह्यांचा 'भूमीसेना चळवळीचे अभ्यासपूर्ण विवेचन' हा लेख आवडला.

**श्री. ग. रा. खंडकर**

१०२ बी, राजेंद्रनगर, इंदोर १२.

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# ' हाकारा '

## ✳ पूर्वीचे अंक ✳

| | | | |
|---|---|---|---|
| ' हाकारा ' पहिला, जानेवारी-मार्च | १९८० | — | जबरन जोत जंगल जमीन |
| ' हाकारा ' दुसरा, एप्रिल-जून | १९८० | — | आदिवासी व शिक्षण |
| ' हाकारा ' तिसरा, जुलै-सप्टेंबर | १९८० | — | आदिवासी व वनसंवर्धन |
| ' हाकारा ' चौथा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० | — | आदिवासी साहित्य व कला |
| ' हाकारा ' पाचवा, जानेवारी-मार्च | १९८१ | — | दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| ' हाकारा ' सहावा, एप्रिल-जून | १९८१ | — | आदिवासी व आरोग्य |
| ' हाकारा ' सातवा, जुलै-सप्टेंबर | १९८१ | — | वनशेती व संवर्धन |
| ' हाकारा ' आठवा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१ | — | रोजगार हमी योजना |
| ' हाकारा ' नववा, जानेवारी-मार्च | १९८२ | — | उत्तरा खंड अभ्यास मोहीम |
| ' हाकारा ' दहावा, एप्रिल-जून | १९८२ | — | धरणे व विकास |
| ' हाकारा ' अकरा-बारा, जुलै-डिसेंबर | १९८२ | — | जंगल व्यवस्थापन |
| ' हाकारा ' तेरावा, जानेवारी-मार्च | १९८३ | — | आदिवासी व दारू |
| ' हाकारा ' चौदावा, एप्रिल-जून | १९८३ | — | आदिवासींच्या सामाजिक/राजकीय चळवळी |
| ' हाकारा ' पंधरावा, जुलै-सप्टेंबर | १९८३ | — | प्रा. सरदार गौरव अंक/आदिवासी साहित्य |
| ' हाकारा ' सोळावा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ | — | आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| ' हाकारा ' सतरावा, जानेवारी-जून | १९८४ | — | आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य |
| ' हाकारा ' अठरावा, जुलै-सप्टेंबर | १९८४ | — | आदिवासी स्त्री |
| ' हाकारा ' एकोणीसावा, ऑक्टो.-डिसें. | १९८४ | — | आदिवासींचे आरोग्य व शिक्षण |
| ' हाकारा ' विसावा, जानेवारी-मार्च | १९८५ | — | आदिवासी संघटना |
| ' हाकारा ' एकविसावा, एप्रिल-जून | १९८५ | — | जमीन हस्तांतर |

Registered with the Registrar of News Papers for India Under No. 35835/80


# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन.

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून **'हाकारा'** सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

## ❀ मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व ❀

| | | | |
|---|---|---|---|
| ☐ | आजीव सभासद | – | २०० रुपये |
| ☐ | परिषद वार्षिक सभासद | – | २० रुपये |
| ☐ | आदिवासी कार्यकर्ते सभासद | – | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अँथ्रापॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी. मनिऑर्डर पाठविल्यास फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

पत्रव्यवहाराचा पत्ता

रा. के. मुटाटकर, सचिव

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,

६४/३ आनंद पार्क, औंध, पुणे–४११ ००७.

★ आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे ! ★